औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २६/६/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०४) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **२६ जुन २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ३.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
2. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
3. श्री. मधुकर दामोधर सावंत
4. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
5. श्री. मो. जावेद मो. इसाक
6. श्री. अ. रशीद खान (मामु)
7. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
8. श्री. संजय रामदास जोशी
9. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
10. श्री. पुरूषोत्तम रघुवीरसिंग ठाकुर
11. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
12. श्री. अ. साजेद अ. सत्तार

संवाद :

श्री.संजय जेशी : जकात खाजगीकरण केले अभिकर्त्याशी जे करारनामा झाला त्यापोटी स्टॅम्प ड्युटी जे शासनाचा महसूल असतो तो अभिकर्त्यांनी भरणा केलेला आहे का? जर भरणा केला नसेल तर झालेला करारनामा हा लिगली खरा ठरू कशतो का?

मा. आयुक्त : हा मुद्दा यापुर्वीही उपस्थित झालेला होता की जे करारनामा करीत आहे त्याची नोंदणी केलेली आहे की नाही. ज्या ज्या महानगरपालिकेचे जकात खाजगीकरण केले त्यांनी कुणीही नोंदणी(रजिस्ट्रेशन) केलेले नव्हते. या संदर्भात लिगली माहिती घेतली होती.मागिल वर्षी सुध्दा असे सांगितले की लिगली बॉयडींग आहे. आपले विधी सल्लागार यांनी सूध्दा म्हटले होते.थोंडे दिवसापूर्वी शासनाचे पत्र आलेले आहे की रजिस्टेशन फिस ३४ ते ३६ लक्ष अग्रीमेंन्ट नूसार होतात. करारनामा करतांना जे काही खर्च लागेल तो जकात अभिकर्त्यांनी करावा असे क्लिअर दिलेले आहे. जकात अभिकर्ता यांना या बाबत कळविले असता त्यांनी हे आम्हाला कायदयाप्रमाणे लागू होत नाही व रजिस्ट्रेशन संदर्भात अपील करीत आहे. अपील केल्यानंतर स्थगिती मिळाली तर ठिक आहे परंतू नाही मिळाली तर पैसे भरणा करावे लागेल, अपील चालू राहिल. पहिल्यादा जी सुनावणी होईल त्यावेळी रजिस्टेशन कार्यालयाची चूक

आहे की नाही मान्य करतात की नाही.पैसे भरणा करण्यावी वेळ आली तरी ज्क्रात अभिकर्त्यास भरावे लागेल. त्यांचे म्हणणे आहे रजिस्ट्रेशन लागू पडत नाही.

श्री.संजय जेशी : खरेदीखत शासनाची स्टॅम्प ड्युटी भरणा केल्याशिवाय अधिकृत धरले जत नाही. असा करारनामा झालेला नाही असे मत अभिकर्त्याने कोर्टात मांडले तर अधिकृत अधिकार काय आहे. १०००/-रू. च्या बॉण्डवर करारनामा करून घेतला अशी माझी माहिती आहे. जे बॉण्डवर घरे विक्री केलेली आहे ते अधिकृत धरणार का याचाही खूलासा करावा.

मा. आयुक्त : विक्री करणे व या कामात फरक आहे रस्त्याचे कामाचे पण करारनामा केला जतो. १० फुटाचा रस्ता असेल तर तेवढेच करारनामा केला जत नाही. मागिल वेळी विधी सल्लागार यांचा सल्ला घेतला होता. रजिस्टर्ड करण्याची गरज नाही म्हणून बॉण्डवर लिहून घेतले आहे.

श्री.संजय जेशी : संबधीत ठेकेदार काम सोडून गेले तर कायदेशीर कार्यवाही करता येईल विधी सल्लागार याचा खूलासा घ्यावा.रस्त्याच्या कामासाठी अटी व शर्ती वेगळया असतात ते बी-१ टेंडर असते त्यासाठी शासनाचे वेगळे नियम आहे. हे व्यवहारीक काम आहे. यातील अटी व शर्ती वेगळया असतात.हे लिगली होत असेल तर इतर कामासाठी १०००-५०० रू.च्या बॉण्ड वर लिहून घेवू जस्त खर्च करण्याची गरजपडणार नाही.

मा. आयुक्त : ज्क्रात अभिकर्त्याची नेमणूक केली त्यातील अटी व शर्ती बंधनकारक आहे. रजिस्ट्रेशन ॲक्ट मध्ये कोणकोणत्या कामाचे कशा प्रकारेच अग्रीमेंन्ट साठी किती रक्क्म लागते हे दिलेले आहे.विघी सल्लागार यांचेकडे माहिती नसेल तर पूढील वेळेस देतील.

श्री.संजय जेशी : स्टॅम्प ड्युटी न भरणा हे केलेले आहे. अधिकृत काहीच नाही. सदर व्यक्ती न्यायालयात गेले तर त्याचे बाज़ूने निकाल येवू शकतो. १००० रू. च्या बॉण्डवर काही अधिकृत नसते. आजपर्यंत कोणी कोर्टात गेले नाही. मध्येच सोडून गेले तर काय करणार, १००० रू.च्या बाँडवर अधिकृत आहे हे मिनिट्समध्ये येऊ द्यावे, पुढे कोणी नाकारणार नाही.

मा. सभापती : या सबंधी पुढील बैठकीत सविस्तर माहिती ठेवावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक : ज्या जगा भूसंपादीत केल्या त्याचा मोबदला दिला अदयाप विकास का केलेला नाही. तसेच बंजरा कॉलनी भागात टेलिफोन कार्यालयाच्या समोरील रस्त्याचे काम चालू असून एका बाज़ूने रस्त्याची दोन तीन फुट उंची वाढविण्याचे कारण काय? शहरात रस्त्यावर डांबरीकरणाची कामे होत आहे एका पावसात पूर्ण रस्ता खराब होत आहे डांबर बरोबर नाही.माझ्या वार्डात डांबरीकरणाचे काम चालू आहे ते बरोबर होत नाही चांगले काम होत नाही तोपर्यत बील अदा करू नये प्रशासनाच्या लक्षात आणून दिले. तरी सूध्दा सदर ठेकेदारास बिल देण्यात आले. कामाची क्वॉलीटी बघीतली जत नाही.

मा. सभापती : मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त :जगा संपादीत केली मोबदला दिला, महापालिकेच्या नावावर झाली नाही अशा दोन तीन प्रकरण असतील. दुसरे असे की लेआऊट मंज़ूर केला संबधीतानी रस्ते केले खूली जगा महानगरपालिकेला हॅडवर्क केली लिजडिड करतात ते केले परंतू जगा महानगरपालिकेच्या नावावर आलेली नाही. गेल्या १० ते १५ वर्षापासून किती जगा

कोणत्या कामासाठी व कोणत्या जगेसाठी किती मोबदला दिला व ज्या जगा महानगरपालिकेच्या नावावर नाही त्या जगेवर महापालिकेचे नाव लावून घेणे व मालमत्ता रजिस्टर तयार करणे ज्या जगा महानगरपालिकेच्या नावावर आहे त्याची यादी त्या जगेचे पी.आर कार्ड ,तसेच आणखी जेकाही रक्क्म लागत असतील त्यांचे अंदाजपत्रक तयार करून स्थायी समितीसमोर ठेवण्याच्या सूचना केलेल्या आहे.या कामासाठी स्पेशल अधिकारी नियुक्त केलेले आहे.दोन तीन सिटी सर्वेचे सेवानिवृत्त अधिकारी आहेत त्यांना या शहराची माहिती आहे. त्यांना बोलवून मासिक मानधनावर ठेवून पूढील सहा महिण्यात ज्या ही जगा आहे त्या महापालिकेच्या नावावर करून सर्वेसह नकाशासह एक रजिस्टर तयार करून घेवू ही मोहिम जेपर्यत हाती घेत नाही तोपर्यत महानगरपालिकेची लिगली किती व कोणती जगा आहे हे कळणार नाही.पूढील १ तारखेपासून ही कार्यवाही सूरू होणार आहे.

श्री.मो.जवेद मो. इसाक :महानगरपालिकेचे पैसे दिले जत आहे. जगा ताब्यात येत नाही. नागरीकांना जे फायदा होणार आहे तो होत नाही. खरी माहिती सभागृहात द्यावी.

मा. आयुक्त : दोन विभागाकडून माहिती घेता येईल नगर रचना विभागाने एफएसआयच्या बदल्यास काही खूल्या जगा ताब्यात घेतल्या असतील. तसेच लेखा विभागाने मोबदला देण्यासाठी किती धनादेश पास केलेले आहे. कोणत्या वर्षापासून रेकॉर्ड काढायचे हे ठरवावे. त्यानंतर एक जेई एक उपअभियंता तसेच दोन सिटी सर्वेचे निवृत्त अधिकारी हे सहा महिण्यकात तपासणी करून माहिती देतील.

श्री.संजय जेशी : सर्व माहिती आल्यानंतर एक बूकलेट तयार करून सर्वसामान्य जनतेला ठराविक रक्कम भरणा करून घेता येईल. जेणे करून महानगरपालिकेच्या शहरात किती जगा आहे व कोणत्या जगेवर अतिक्रमण झालेले आहे हे कळेल.

मा. आयुक्त : इंटरनेटवर विना मूल्य उपलब्ध करून देवू.

श्री.अ.रशिद खान : नवीन जेसीबी वाहन खरेदी केले दुसऱ्याच दिवशी वर्कशॉपवर दुरूस्तीसाठी दिले. याची माहिती मागविली उत्तर मिळालेले नाही.

मा. सभापती : टेलीफोन कार्यालया समोरील रस्त्याची उंची का वाढविली खूलासा करावा.

शहर अभियंता : सर्व डांबरीकरणाचे कामासाठी एसजीएस कंपनीला पी.एम.सी. म्हणून नेमलेले आहे. जेंव्हा काम चालू असते त्यावेळी ते सर्व तपासणी करतात. ते कॉलीटी कन्ट्रोलचे ते रिपोर्ट देत आहे त्याचे नमुने घेवून इंजिनिअरींग कॉलेजला पाठवून महापालिका तपासणी करून घेत आहे. पीएमसीने जे डिजईन दिले त्याप्रमाणे रस्त्याची उंची वाढविली असून नॅशनल हायवेच्या स्पेशीफिकेशन प्रमाणे काम करीत आहे.

श्री.मो.जवेद.मो.इसाक : शहरातील अंतर्गत रस्ता आहे. नॅशनल हायवेचा नाही. तरी ही उंची का वाढविली.

मा. आयुक्त : त्या रस्त्याचे पूर्ण रूंदी व पाणी कसे येणार व ते वाहून जण्यासाठी किती प्रमाणात जगा सोडावी तसचे फुटपॉथच्या खाली किती जगा असावी याची पूर्ण क्रॉस सेक्शन डिजईन आयआरसी मानकाप्रमाणे पीएमसी कडून करून घेतलेली आहे.

श्री.मो.जवेद मो.इसाक : अनेक वर्षापासूनचा तो रस्ता आहे. यापूर्वी उंची वाढविली नाही. आजच का गरज पडली. त्या रस्त्यावर पाणी साचत नाही. एक साईडने वर व एक साईडने खाली असे का करण्यात येत आहे.

मा. आयुक्त : या रस्त्याची डिजईन ही आयआरसीच्या स्पेसीफिकेशन प्रमाणे केली असून आयआरसीने वेगवेगळया रोडची डिजईन वेगळी केली आहे नॅशनल हायवेचे कसे असावयास पाहिजे ज्यावेळी चर्चा झाली होती सिमेंन्टचे रस्ते करावे जेणे करून दहा वर्ष टिकेल त्यावेळी नॅशनल हायवचे स्टॅण्डर्ड प्रमाणे करू असे प्रशासनाने म्हटले होते. तेही जस्त काळ टिकतील सिमेटचे रस्ते करण्यास जस्तीचा खर्च येतो.

श्री.मो.जवेद मो.इसाक : रस्ता का उंच करीत आहे याचे उत्तर अधिकारी देवू शकत नसतील त्यांना खूर्चीवर बसण्याचा अधिकार नाही त्याचे वेतनावर खर्च का करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : शहरातील जलना रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येतो. २५ वर्षात रस्त्याची होणारी महापालिकेची कामे हा विभाग एक वर्षात करतात.औरंगाबाद जलना सर्वांत मोठा रस्ता आहे. त्या रस्त्याचे चांगले काम न करता महानगरपालिकेने इंन्टरनल रस्त्याचे चांगले रस्ते असतांना वाटेल तसे खोदकाम करून उंची कमी जस्त करून, जस्तीची खडी मुरूम टाकून मोठा खर्च करून रस्त्याची वेगळया पध्दतीने कामे केली जत आहे याचा अर्थ सार्वजनिक बांधकाम विभागापेक्षा मनपाने कोणत्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला, याचा शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम कसे असते त्याचा विचार न करता. चांगले रस्ते करायचे असेल तर आयआरसी चे स्पेसीफिकेशन प्रमाणे क्रॉस सेक्शन घ्यायला पाहिजे त्याप्रमाणे त्यावरील लोड स्ट्रटा, सर्व बाबींचा विचार करून किती खोली असावी, त्यात किती मुरूम, कोणत्या आकाराची खडी वापरायची, महानगरपालिका प्रथमत: करते. प्रती कि.मी. खर्च वाढतो. पुन्हा प्रश्न येणार नाही. ठाणे मध्ये एमएसएसआरडीसी कडून रस्ते झालेले आहे नागपूर मध्ये झाले तेच क्रॉसेक्शन घेवून ही महापालिका रस्ते करीत आहे. याचे जे क्रॉससेक्शन आहे ते आयआरसी प्रमाणे करणार आहे. रस्त्यांची उंची, ड्रेनेजव्यवस्था, फुटपाथखाली घेणे, या वाहिन्या कोठून येतात, कोठे मिळतात यावर अवलंबून आहे. रस्ता दुभाजक क्रॉस करीत नाही. नागपूर मॉडेल सारखे वापरतो. नॅशनल हायवे प्रमाणे करीत आहोत. सिमेंन्टचे रस्ते करू शकत नाही त्यासाठी खर्च जस्त लागतो. परंतू यामूळे १० ते १२ वर्ष रस्ते खराब होणार नाही. यामूळे अशा कामात प्रत्येक कि.मीटर मागे जस्तीचा खर्च वाढतो. हे जरी सत्य असले तरी थोडेसे कामासाठी खर्च केला नाही तर पून्हा पून्हा ते रस्ते खराब होतात. त्यामूळे नागपूर हायवे प्रमाणे या ही शहरात रस्ते तयार करत आहोत.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : सर्वसाधारण सभेचे जेवढया रक्कमेला मान्यता दिली त्याप्रमाणे त्या रस्त्याचे काम होत आहे का?उदा. सर्वसाधारण सभेने दिं. २५.५.०६ रोजी प्रस्ताव मंजूर केला त्याची प्रत आपणाकडे दिली आहे. पान क्र १ वर त्यात सेव्हनहिल चौक ते शिवाजीनगर ३० मीटर रूंद रस्त्याचे असे दोन रस्ते साठी ५.२५ कोटीस मान्यता दिली होती.या कामावर प्रशासनाने ५.७१ कोटी खर्च केले. जळगाव टी पॉईन्ट ते जटवाडा रोड यासाठी सर्वसाधारण सभैने १.८१ कोटीच्या खर्चास मंजूरी दिली महापालिका प्रशासनाने २.८५ कोटी खर्च केले. हर्सूल ते ऑडीटर सोसायटीकडे जणारा रस्त्यास १.०२ कोटीची मंजूरी असतांना प्रशासनाने १.६३ कोटी खर्च केले आहे. सिल्लेखाना चौक ते लक्ष्मण चावडी रस्त्यासाठी १.३१ कोटीची मंजूरी असतांना २.०५ खर्च केले. लक्ष्मण चावडी रस्ता २.०८ कोटी खर्चास मान्यता

असतांना ३.१३ कोटी खर्च केले. तसेच बाराभाई ताज रोडसाठी दिं. २०.५.०६ च्या बैठकीत ३१ लक्षची मंजूरी होती त्यावर जस्त केला असे एकूण प्रशासनाने सर्वसाधारण सभेंच्या मंजूरी व्यतिरिक्त ४.३४ कोटी रू.जस्तीचा खर्च केला आहे.त्यास सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी ही घेतलेली नाही .ॲक्ट नुसार मा. आयुक्त यांना १० लक्षपेक्षा जस्त खर्च करायचा असेल तर स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. असे असतांना ४.३४ कोटी जस्तीचा खर्च मा. आयुक्तानी कोणत्या अधिकारात केला याचा खूलासा होणे गरजेचे आहे.

शहर अभियंता : प्रत्येक कि.मीटर पर्यत अंदाजेत ढोबळ मानाने किती खर्च लागेल असे गृहीत धरून अंदाजपत्रक तयार करून सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली होती. त्यानंतर पीएमसी निश्चित केली त्यांनी त्याचे टेंक्नीकल कर्मचारी यांचेकडून तपासणी केल्यानंतर अंदाजपत्रक दिले. त्यात वाढ झालेली आहे.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : सर्वसाधारण सभेत जेंव्हा प्रस्ताव आले त्यात अंदाजपत्रक दर्शविण्यात आलेले नव्हते. काही रस्त्याचे बाबतीत कि.मी. उल्लेख नव्हता.काहीचा होता. पान क्र २ चा ज्याला रंग नाही अशी कागदावर कि.मी. दर्शविलेले असून आठ रस्त्यामध्ये कि. मी. दर्शविलेले नाही. ४.३४ कोटी होत असलेला जस्तीच्या खर्चास सभागृहाची मंजूरी घेणे आवश्यक की नाही याचा ही खूलासा करावा. आदिनाथ कंपनीला काम देण्यासाठी त्या एजन्सीचे रजिस्ट्रेशन ३ कोटीचे होते. त्यांना काम ३.५० कोटीचे काम दयायचे म्हणून टेंडर २.६० कोटीचे दैनिक लोकविजय वृत्तपत्रात देण्यात आले. सदरचे काम प्रगतीपथावर आहे. नियमानूसार जॅइन्ट व्हेन्चर व्हायला पाहिजे होते. याची फेर निविदा काढण्याची गरज का पडली नाही. टेंडर काढले २.६० कोटीचे काम दिले ३.५० कोटीचे यात महापालिकेचे ईएमडी मिळाली नाही शासनास सेल्स टॅक्स मिळाला नाही.

मा. आयुक्त : जेंव्हा एखादी एजन्सी जेवढे रक्कमेचे काम घेते त्यांचेकडे तेवढे रजिस्ट्रेशन असायला पाहिजे डिफर्ड पेमेंटचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेला स्थायी समिती मार्फत गेलेले होते. त्यात ५-६ ची वाढ केली होती.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जेप्रस्ताव स्थायी समिती सर्वसाधारण सभेत आले होते त्यात कि.मी. उल्लेख करून अंदाजपत्रक दिलेलेच नव्हते.

मा. आयुक्त : प्रशासनाकडून काही कमतरता दिसूल आल्यास त्याच त्याच वेळी सर्वसाधारण सभैचे मान्यता दयायला नको होती. पान क्र २ नूसार प्रशासनाने २१रस्त्याचा प्रस्ताव ठेवला सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा होवून आणखी ०९ रस्त्याचा समावेश केला. २५ कोटीत हे बसणार नाही. ३० रस्ते झाले त्यापैकी प्रशासनाने पाच रस्त्याचे काम चालू केले. २५ कोटीत जेवढे बसतील तेवढे करता येईल. जस्तीत जस्त २५ कोटी पृती वर्ष डिफर्ड पेमेंटवर करता येईल. २५ कोटीत ३० रस्ते होणार नाही. यापुर्वी आयआरडीपी मध्ये घेतले होते. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने जी वाढ केली ते पुर्ण होणार नाही. २५ कोटीतच काम करावे लागेल. आणखी वाढ केली तर होणार नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सर्वसाधारण सभा सर्वोच्च सभागृह असून धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार आहे. असे असतांना सर्वसाधारण सभेच्या निर्णयानूसार काम सूरू न करता

प्रशासनाने ५ ठराविक रस्त्याचे पीएमसी नेमून काम सुरू केले. असे असेल तर सभेमध्ये प्रस्ताव कशासाठी ठेवला जतो.दिं. १०.१.२००६ रोजी स्थायी समितीने ठराव क्र १७१ नूसार ५० टक्के कामे ही श्रीखंडे पीएमसी नेमून करावी व ५० टक्के कामे ही महानगरपालिकेच्या अभियंता मार्फत करावी असा ठराव केला परंतू प्रशासनाने श्रीखंडे पीएमसी यांना डायरेक्ट ५० कोटीची कामे दिली.ती कोणत्या अधिकारात दिली व पीएमसी नेमण्याची पध्दत काय असते खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावात किलोमीटर दर्शविलेले होते. परंतू जे रस्ते ॲड करण्यात आले त्यात कि.मी. उल्लेख नव्हता. या कामाचा प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर करून सर्वसाधारण सभेकडे पाठविला होता. २५ कोटीमध्ये जेवढे काम होवू शकते तेवढे कामाचे कि.मीटर सहीत डिफर्ड पेमेन्टवर रस्ते करण्याचे दिले होते. स्थायी समितीने ५ ते ६ रस्त्याचे आणखी नावे समावेश केली त्यानंतर सर्वसाधारण सभेने ९ रस्त्याचे कामाचा समावेश केला जेसभागृहाने रस्ते ॲड केले त्यात कि.मी. दिलेले नव्हते. प्रशासनाच्या मतानूसार ७ ते ८ रस्ते होणार होते. त्यात १५ ते १६ रस्ते ॲड केल्यानंतर २५ कोटीत हे सर्व रस्तेची कामे होणे शक्य नाही.जितके रस्ते होतील तेवढे घेतले. कारण डिफर्ड पेमेन्टवर पुढील तीन वर्षात महानगरपालिकेला रक्क्म द्यायची आहे. कमीत कमी २५ कोटीचे रस्ते डिफर्ड पेमेन्टवर करू शकतो . कारण ७ ते ८ कोटीपेक्षा जस्त पेमेंन्ट दर वर्षी देवू शकणार नाही. सभागृहाने आणखी रस्त्यांचा समावेश केल्यामुळे २५ रस्ते ३० कोटीत होणे शक्य नाही. यापुर्वीही रस्त्यांचा विकास करण्या संदर्भात सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवला होता त्यात सभागृहाने आणखी रस्ते ॲड केले. सिमेंन्टचे रस्त्यातही डिफर्ड पेमेंन्टच्या रस्त्यामध्ये ३० रस्तेची वाढ झाली यानंतर एकूण किती रस्ते करणार आहोत यावर चर्चा झली माहिती घेतली २५ कोटीचे डिफर्ड पेमेन्टवर, २५ कोटी शासनाचे रक्कम तसेच ६०कोटी कर्जसाठी दिलेल्या शासनाकडे मंजूरीसाठी आतापर्यत मंजूरी आलेली नाही.त्यासाठी एकत्रितच ११० कोटीत अमुक अमुक रस्ते करावे म्हणून पाठवावे आणखी वाढ केली तर रक्कम तेवढीच आहे. सर्वच रस्ते होणार नाही. दिर्घकाळ पर्यंत रस्ते चांगले पाहिजेअसतील तर जस्त खर्च येणारच आहे. कोणत्याही कामासाठी किती खर्च लागेल हा अंदाजकाढला जतो त्यानंतर डिटेल प्रत्यक्ष पाहणी करून मोजणी तपासणी करून अंदाजपत्रक करावे लागते. २५ कोटीत किती रस्ते करू शकतो त्यानुसार मंजूरी द्यायला पाहिजेहोती. ११० कोटीत किती कामे होतील ते सर्वसाधारण सभेने ठरवून द्यायला पाहिजेहोते. अमुक रस्त्याची कामे घेतली म्हणून सर्वसाधारण सभेला कळविलेले होते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मागिल सर्वसाधारण सभेत तसेच दिं. १३.१.२००६ मध्ये दिं. १८.२.२००६ मधील रस्ते नवीन आहे का? चार वेळेस वेगवेगळे रस्त्याचे प्रस्ताव ठेवले. यात जे सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या रस्त्याचे संदर्भात प्रस्ताव होता. सदर रस्ते कोणते आहेत. कर्ज घेवून ६० कोटीचे रस्ते करण्याचा ठराव ऐनवेळी ठेवून नेहमीच्या पध्दतीने मंजूर करणे योग्य नाही. नगरसेवकांना विश्वासात घेतलेले नाही. प्रत्येक बैठकीला अलग अलग पध्दतीने प्रस्ताव ठेवून मान्यता घेतली जते व काम वेगळयाच पध्दतीने चालू असते. सभागृहाची मंजूरी घेतल्यानंतर ४.३४ कोटीची जस्तीच्या खर्चाचे काम प्रशासनाने कोणत्या अधिकारात केलेले आहे. ६० कोटीचे कर्ज

महापालिका घेत आहे. सदस्यांना विश्वासात घेतले नाही. तसेच पीएमसी नेमण्याची जी पध्दत आहे ती बरोबर नाही. दिं. ५.१०.२००५ पीएमसीचे प्रतिनिधी हजर होते किती पीएमसीचे हजर होते याचा उल्लेख नाही. सदर बैठकीत सर्वप्रतिनिधींना त्यांचे कामाची माहिती व अनुभव असल्या बाबत पुस्तीका सादर करण्या बाबत सूचविलेले आहे. एमएसआरडीसीने पीएमसी नियुक्त करण्या बाबतची जी पध्दत आहे त्यांनी दाखल करण्याचे म्हटले नाही. एमएसआरडीसीने स्वत: पूस्तक छापलेले आहे. त्यानुसार टेंडर फॉर्म भरून द्यावे लागते. जे लोयस्ट राहिल त्यांना काम दिले जते. यानंतर असे दिले की त्यानुसार श्रीखंडे कन्स्ल्टंन्ट मुंबई व संघीय सिगरानी पुणे यांनी त्यांचे कामाची व अनुभवाची पुस्तीका सादर केलेली होती. त्यांना माहिती नाही फॉर्मेटमध्ये द्यायला पाहिजे संबधीत गुत्तेदार त्यांचे फॉर्मेट मध्ये माहिती भरूण देत नाही महापालिकेच्या फॉर्मे मध्ये भरून देतात. यानंतर असे दिले की श्रीखंडे कन्सल्टंट यांना पाटबंधारे खात्याचा पीएमसी म्हणून कामाचा भरपूर अनूभव दिसून येतो. हे विचारात घेता श्रीखंडे कन्सल्टंट प्रा लि. मुंबई यांना ५० कोटीचे काम देवून टाकले. याचा अर्थ १ लक्षचे वार्डात काम असेल तर डायरेक्ट ठेक्देाराला आयुक्तांच्या दालनात बोलवून काम देवू शकतो का?

मा. आयुक्त : ज्या ज्या वेळी प्रशासनाने रस्त्याचे प्रस्ताव ठेवले असतील तेंव्हा पाच ते सहा रस्ते दिले असतील तर त्यात आणखी ५-६ रस्ते टाकून वाढ झालेली आहे. रस्त्याच्या कामासाठी २५ कोटी आहेत व तेवढया पर्यंतच कामे करता येतील. जेजस्तीचे रस्ते आले त्याचे काम कसे करायचे हा प्रश्न समोर पडतो. ५० ते ६० कोटीपर्यंत काम करण्याची प्रशासनाची क्षमता आहे व उर्वरीत ५० कोटीचे रस्ते जेकाही सर्वसाधारण सभेने नवीन समावेश केलेले आहे ते कर्ज घेवून तयार करू असे विचार विनिमय झाले. ५० कोटीच्या रक्कमेत जे रस्ते करायचे होते ते प्रशासनाने निवडलेले आहे. ११० कोटी किती रस्ते होणार म्हणून पून्हा ठेवायचे सूचना केल्या आहे. ५० कोटीचे रस्ते करण्याचे कारण असे की नगररचना विभागाकडून जे उत्पन्न येते ते डीपी अंमलबजवणी मध्ये जयला पाहिजे परंतु असे होत नाही. नगररचना विभागाचे जे उत्पन्न येते ते महापालिकेच्या फंडात जमा झाल्यानंतर इतर कोणत्याही कामावर खर्च केले जते. त्यासाठी दर वर्षाला जे १२ ते १३ कोटी मिळतात ते बॅकेला देण्यास मान्य केले तर पाच सहा वर्षात त्याची परतफेड करू शकतो. असे हे ५० कोटी आहेत. ५० कोटी होत आहेत. हे ५० कोटी नगररचना विभागाकडून येतात ते बँकेला हप्ते परतफेडसाठी देवू. सर्वसाधारण सभेकडे दिले. त्यानंतर शासनाकडे दिले. ६० कोटीला सर्वसाधारण सभेने मान्यता दिली. एकदा सर्वसाधारण सभेने मान्यता दिली तर सर्वसाधारण सभेने प्रस्ताव दिली तो प्रस्ताव डिफेन्ड करायला पाहिजे ५०कोटीचा प्रस्ताव पाठविलेला आहे. १० कोटी यामूळे वाढ झाले की, चिकलठाणा भागात रस्त्याची स्थिती चांगली नाही. एमआयडीसी येरीयातील लोक प्रशासनाकडे सतत येवून भेटतात. त्यासाठी असा मुद्दा मांडला होता की जे एमआयडीसी कडून मालमत्ता करा पोटी ५.५० ते २.०० कोटी दर वर्षी येतात ते बँकेला सहा वर्षासाठी देण्याचे मान्य करू व त्याचे बदल्यात १० कोटी प्राप्त करू. १० कोटी एमआयडीसी कडून घेत आहोत. असे २० कोटीचे रस्ते त्या भागात केले जतील. ६० कोटीचा प्रस्ता सभागृहाने मान्य केला तो शासनाकडे गेलेले आहे. जेस. सदस्य यांनी वाचून

दाखविलेला प्रस्ताव प्रशासनाकडून दिलेला नाही स्थायी समितीकडून आलेला प्रस्ताव आहे. जी काही चूक सांगत आहे प्रशासनाची चूक कन्टीन्यू केली असेल यामध्ये स्थायी समितीने चर्चा करून मान्य केलेला प्रस्ताव आहे. जेव्हा इन्टरनेटवर टेंडरींग सुरू केले, रजिस्ट्रेशन करायला सुरू केले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे रजिस्ट्रेशन असते ते ग्राहय धरून काम दिले जते. एमएसआरडीसी १०० टक्के काम पीएमसीकडून करते. दोन प्रकारचे मॉडल वेगवेगळे आहे. पीडब्ल्यूचे वेगळे, एमएसआरडीसीचे वेगळे आहे. सार्वज्निक बांधकाम विभाग व एमजेपी यांनी आस्थापनेवर इंजिनियर घेतलेले असून त्यांचेकडून काम करून घेतले जते. त्यावर १७ टक्केच्या आसपास खर्च येतो. त्यामूळे पाणीपूरवठयाचा खर्च पीडब्ल्यूडी एमजेपी हे महापालिकेकडून १७ टक्के आस्थापनेचा खर्च घेते. परंतू एमएसआरडीसीने अस्थापनेवर इंजिनिअर घेतलेले नाही. पीएमसी मार्फत काम करून घेतात. म्हणून ३ ते ४ टक्के अस्थापना खर्च होतो. त्यामूळे १२ ते १३ टक्केची बचत होते. पीएमसी प्रमाणे नागपूर ठाणे मुंबईतही रस्त्याची कामे झालेली आहे. एमएसआरडीसीचे सर्व रस्ते पीएमसी मार्फत केले जतात. एमएसआरडीसी कडील जेवढे पीएमसी रजिस्टर्ड आहे त्याची यादी मागविली त्या सर्वांना पत्र देवून बंद पॉकीटमध्ये सर्वांकडून निवीदा मागविण्याचे सूचना दिल्या होत्या. यात तीन एजन्सीने सहभाग घेतला पीएमसी नेमण्याचे दुसरे कारण असे की अस्तीत्वात असलेले अधिकारी यांचेकडे कामाचा व्याप जस्त आहे. तसेच चांगले काम पाहिजेअसेल तर १०० टक्के तपासणी करून पीएमसी काम करते. पीएमसीची नेमणूक न करता एवढा निधी खर्च करू नये महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे अनेक कामे आहेत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एमएसआरडीसी पीएमसी मार्फत काम करीत असेल परंतू महापालिकेला पीएमसीकडून काम करून घेणे बंधनकारक नाही.जे बेरोजगार अभियंते होते त्यांना काम मिळावे शासनाने पीएमसी कडून करून घेतले असेल शासन १५ लक्षचे काम डायरेक्ट देतात. महापालिका देवू शकते का? दि. ८.१२.१९८२ ला महापालिका अस्तित्वात आली. सन २००६ पर्यत पीएमसी नेमणूक केली नाही. सन २००६ मध्ये का गरज पडली आहे. एमएसआरडीसी कडे अभियंते नाही म्हणून पीएमसी नेमणूक करते महापालिकेकडे अभियंते आहे त्यांचेकडे कामे द्यावी स्थायी समितीने ५० टक्के काम पीएमसी कडून व ५० टक्के काम हे महानगरपालिकेने करावे म्हणून निर्णय दिला त्यांची अमलबजवणी केली नाही. महापालिकेत काम करण्यास इंजिनियर सक्षम आहे. ५ ते ६ कोटी पीएमसीला देवून काम करून घेणे बंधनकारक नाही.

मा. आयुक्त : एमएसआरडीसी जसे काम करते त्याप्रमाणे महापालिकेने करणे बंधनकारक नाही. परंतू पीएमसीच्या मार्फत ठाणे, नागपूर, मुंबई मध्ये जी कामे झाली ते योग्य आहे म्हणून प्रस्तावित केले होते. पीएमसी नेमणे योग्य आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे रजिस्टर्ड ठेकेदार असतात त्यांना काम देतो त्या प्रमाणे एमएसआरडीचे रजिस्टर्ड पीएमसी येथेच नाही तर पूणे, नागपूर, मूंबई येथे घेतलेले आहे. महापालिकेकडे असलेले अभियंता यांचेकडे १०० टक्के जस्तीचा कामाचा व्याप आहे. ५०ते ६० कोटीचे कामे करायची असेल तर एका रस्त्यावर १५ ते १६ अभियंता सुपरव्हिजन साठी आवश्यक आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मुंबई महानगरपालिकेचे बजेट हे एक राज्याचे बजेट आहे. नागपूर,पूणे महापालिका मोठी असून बजेट ही जस्त आहे. सन १९८२ ते सन २००६ पर्यंत महानगरपालिकेने चांगले रस्ते केलेले आहे पीएमसी नेमण्याची आताच का गरज भासत आहे. आर्थिक स्थिती बरोबर नाही स्पीलओव्हरमध्ये अनेक कामे जत आहे. अधिकाऱ्याकडे कामाचा व्याप जस्त असता तर स्पील ओव्हरमध्ये कामे गेली नसती. इतर महापालिका करते म्हणून या महानगरपालिकेने करणे बंधनकारक नाही. प्रशासनाने केलेला खूलासा योग्य नाही. ५० टक्के काम महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याकडून करून घ्यावे म्हणून स्थायी समितीने निर्णय दिला होता. परंतू डायरेक्ट ५० कोटीचे काम पीएमसीला दिले असे एकूण २०० कोटीचे काम पीएमसीच्या मार्फत होत आहे. स.सदस्याचे वार्डातील ५० हजराचे काम एक दोन निविदा आल्या रिंग झाली म्हणून रिटेंडर केले जते. ५० कोटीच्या मागे पीएमसीला १.५० ते २.०० कोटी फिस देणार आहोत. जेंव्हा मा.आयुक्त यांनी दि. ५.१०.२००५ रोजी बैठक घेतली तेंव्हा दोन एजन्सी धारक उपस्थित होते.

मा. आयुक्त :स्थायी समितीने मान्यता देण्या अगोदर निदर्शनास आणून दिले असते तर योग्य होते. स्थायी समितीच्या मान्यतेने सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव गेलेला होता. एमएसआरडीसीचे रूल केले त्याप्रमाणे करीत आहोत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एमएसआरडीसी कडे अभियंता कर्मचारी नसते म्हणून पीएमसीला काम दिले जते. महापालिकेकडे कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे. १९८२ पासून महापालिका झाली. तेंव्हापासून सन २००६ पर्यत कोणत्याही कामासाठी पीएमसी नियुक्त केली नाही आताच का गरजपडत आहे.पीएमसीला पाच ते सहा कोटी फिसपोटी जणारी रक्कम या शहरातील आम नागरीकांच्या करातील ती रक्कम जणार आहे. याचा विचार करावा.

श्री.संजय जेशी : आताच विरोधी पक्ष नेते यांनी म्हटल्या प्रमाणे अमुक कामासाठी जी जस्तीची रक्कम लागलेली आहे त्या बाबतीत खूलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्रीखंडे कन्सल्टंट या एजन्सीची पीएमसी म्हणून नेमणूक केली. ५० कोटीच्या कामा मागे १.२५ कोटी फिस द्यावी लागणार आहे. रेल्वेस्टेशन येथील ८ कोटीचा प्रोजेक्ट केला त्यासाठी फिस जणार आहे. तसेच बसस्टॅण्ड जवळीत कामाच्या बाबतीत पीएमसी नियुक्त केली. केंद्र शासनाकडून १२ कोटी आले त्यातून होणारे कामासाठी पीएमसी नियुक्त केली. सेंट्रल नाक्या जवळील २० कोटीच्या कामासाठी फिस देणार असे एकूण ३ कोटी पीएमसीला देणार आहे. एमएसआरडीसीकडे तांत्रिक कर्मचारी नसल्यामुळे पीएमसी नियुक्त करतात. पीएमसीला काम देत गेलो तर महापालिकेच्या अधिकाऱ्यांना एमबी रेकॉर्ड शिवाय दूसरे कामच नाही असे वाटते.

श्री.संजय जेशी : एक कार्यकारी अभियंत्याकडे किती उपअभियंता किती जेई तसेच इतर कर्मचारी असणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : जी चर्चा होत आहे ती योग्य आहे. परंतू एक वर्षापूर्वी ही चर्चा करायला पाहिजेहोती. बीओटीमध्ये रेल्वेस्टेशन, सिध्दार्थ उद्यान तसेच धोबी घाट येथील कामासाठी पीएमसी ची नेमणूक केली. पीएमसीला जे पैसे मिळणार आहे ते डेव्हलपर कडून मिळणार आहे. पीएमसीला दिले नसते तर पैसे वाढवून मिळाले असते. गुंठेवारी

आयएसडीपी मध्ये पीएमसी नियूक्त केलेली आहे. शासनाकडून १२ कोटी आले व पून्हा १५ कोटीचे प्रस्ताव या आठवड्यात जत आहे. एकूण १७६ कोटीचे प्रस्ताव पाठवायचे आहे.तसेच रस्त्यासाठी पीएमसी नियुक्त केली.एमएसआरडी कडे कर्मचारी नसतात म्हणून पीएमसी ला काम दिले जते. त्याच प्रमाणे बजेटनूसार ११० कोटीची कामे, त्या कामाची क्वॉलीटी तपासणे, १०० टक्के सर्वे करणे, १०-१५ मी. वर खड्डे खोदणे, सॅम्पल घेणे, डिजईन करणे, यासाठी प्रत्येक ठिकाणी एक उपअभियंता लागतात. ते करण्यासाठी जे कर्मचारी वर्ग महापालिकेला लागतो तेवढा सुध्दा नाही म्हणून महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून हे काम करून घेणे शक्य नाही. पीएमसीकडे काम देवून सुध्दा प्रत्येक रस्त्यावर २४ तास देखरेख करण्यासाठी अधिकारी कमी पडतात. कर्मचारी वर्ग नियुक्त केल्यास त्याचा अस्थापनेचा खर्च त्यांचे पेन्शन हा खर्च वाढेल. पुढील काळात नेहमीच २०० कोटीची कामे होणार नाही. रस्ते चांगले केल्यास शहराची लोकसंख्या वाढते त्यामूळे बजेट सुध्दा वाढते. पीएमसी नियुक्त केली नसती तर आयएसडीपी मध्ये शासनाकडून निधी मिळाला नसता. शासनास १.५ टक्के प्रमाणे १२ ते १८ लक्ष दिले असेल परंतू त्यामूळे १२ कोटी रू. महापालिकेस मिळाले. गुंठेवारीमध्ये १५०० संचिका होवून २.६० कोटीच वसूल झालेले दिसतात परंतू या शहरातील ३८ हजर घराचा सर्वे झालेला असून १६ हजर संचिका तयार झालेल्या आहे हे सर्व कामे करण्यासाठी पीएमसी नियुक्त करावीच लागेल. कारणा नवीन कर्मचारी भरती करणे अडचणीचे आहे दोन वर्ष लागतील.

श्री.अ.साजेद अ. सत्तार :पीएमसी धारकांना आयुक्तांच्या दालनात बोलवून नियुक्त करणे अशी पध्दत नसते.

मा. आयुक्त : जितके एमआरडीसीचे रजिस्टर्ड पीएमसी होते त्यांना सर्वांना पत्र देवून बोलवून घेतले त्यापैकी ८ते ९ उपस्थित होते.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : वार्डात तातडीचेकाम असेल तर अशाच पध्दतीने ठेकेदारास दालनात बोलवून काम दिले जणार आहे का ?एमएसआरडीसी कडे टेक्नीकल कर्मचारी नसतात म्हणून पीएमसी नेमतात महापालिकेकडे टेक्नीकल अधिकारी, कर्मचारी आहे असे असतांना पीएमसी नेमण्याची गरजका पडते.

मा. आयुक्त :अनेक चांगले काम करणारी एजन्सीजआहे. या कामासाठी महापालिकेकडे जस्तीचा टेक्नीकल कर्मचारी वर्ग नाही.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : पीएमसीचे १९ लोक होते. त्या संर्वाना बोलविणे गरजेचे होते. बजेट वाढले म्हणून डायरेक्ट दालनात बसून कामे देणे चूकीचे आहे. तसेच महानगरपालिकेच्या फॉर्मेट मध्ये त्यांनी माहिती भरून दिली एमएसआरडीसीच्या फॉर्मेटमध्ये माहिती दयायला पाहिजेहोती.ती दिली नाही दिली असेल तर सभागृहात दाखवावे.

मा. आयुक्त : यामध्ये जेवढी स्पर्धा अपेक्षीत होती ती झालेली आहे. तीन लोक आले होते पूर्ण कॉलीफाईड होते. एकाच व्यक्तीला हे काम दिले जणार नाही. प्रशासनाने जे निर्णय घेतला त्यास स्थायी समिती सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. कामास सूरूवात झालेली आहे

श्री.अ.साजेद अ.सत्तार : पीएमसीचे जेलोक आले ते आयुक्तांच्या दालनात चर्चा होवून निर्णय घेतला स्थायी समितीने निर्णय तसा घेतलेला नाही. जेएजन्सीचे लोक आले त्यांचेकडून नियमानूसार

फॉर्मेट मध्ये माहिती भरून घेतली आहे का ?जे करारनामा केला त्यात खूप तृत्या आहेत. १.२५ कोटी देवूनही एजन्सीने काही गडबड केल्यास महानगरपालिकेला कायद्याने कार्यवाही करता येणार नाही.

मा. आयुक्त : जेव्हा एजन्सीचे लोक आले होते.एमएसआरडीसी चे जेअटी व शर्ती आहे त्याप्रमाणे काम दिलेले आहे.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : महापालिकेच्या फॉर्मेटनूसार माहिती भरून घेतली नियमाने जे कागदपत्राची पूर्तता करावयास पाहिजेहोती ती केलेली नाही. ती का केलेली नाही.

मा. आयुक्त : १९ लोकांना बोलविले होते. त्यापैकी ३ एजन्सी काम करण्यास तयार झाले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रत्येक काम मा. आयुक्त नियमाने करतात त्या प्रमाणे हे सूध्दा काम नियमाने करणे गरजेचे होते.सर्वांना सारखे नियम असावेत.प्रशासनाने मनमानी करून पीएमसीची नेमणूक केलेली आहे हा आरोप माझा आहे.

श्री. संजय जेशी : जेंव्हा प्रस्ताव सभागृहात आला होता त्याच वेळी स. विरोधी पक्ष नेता यांनी अक्षेप घेतला असता तर योग्य झाले असते. यापूढे असे होवू नये याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सर्वसाधारण सभेने दिलेल्या मंजूरीच्या व्यतिरिक्त ४.३४ कोटीच्या जस्तीच्या कामास प्रशासनास मंजूरी देण्याचे अधिकार नाही.असेल तर कोणत्या नियमानूसार आहे.

मा. आयुक्त : ज्या ज्या कामाची ऑर्डर दिलेली आहे ती स्थायी समितीच्या मान्यतेने दिलेली आहे.

श्री. कचरू मोरे : नाला सफाईचे टेंडर काढले जी काही सफाई करण्याची लेंथ दिली होती तेंव्हढी न होता पूलाच्या बाजूनेच सफाई झालेली आहे.प्रतापनगरच्या दोन्ही नाले अशा पध्दतीने साफ करण्यात आले जेसीबी मशीनने नाल्यातून घाण काढली ती बाजूला टाकली गेली पून्हा पावसाच्या पाण्याने ते नाल्यात जईल. साफ सफाई झाल्याने काही चित्र दिसून येणार नाही. रेल्वे पूलाजवळ मिलिंदनगर भागात जेसीबी जत नाही तेथे नाल्यात बेशरमीची झाडे मोठी झालेली आहेत. पाणी वाहून जत नाही. किमान ती झाडे तोडण्याचे काम ठेकेदारानी करावयास पाहिजे ते केले नाही. नाला सफाईचे काम करण्यास ठेकेदारास भाग पाडावे नसता पुढील स्थायी समितीच्या बैठकीत अशा ठैकेदारा काळया यादीत समावेश करावे.

श्री.संजय जेशी : प्रतापनगरचा नाला माझ्या वार्डाच्या बाजूने वाहतो. एका एजन्सीने या नाल्याचे साफसफाईचे टेंडर ३२ टक्के बिलोने टेंडर घेतले त्या ठेकेदारास काम करण्यास भाग पाडले परंतू त्यांनी काम पूर्ण करीत नाही म्हणून ते थांबविले आहे पावसाळयात जीवीत हानी होवू नये म्हणून पूलाजवळ महापालिकेच्या जेसीबी साफसफाई केली.सदर एजन्सीने काम केले नाही म्हणून काळया यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही करावी.

श्री.मो.जवेद मा.इसाक : नाला सफाईसाठी लाखो रूपये खर्च करून ठेकेदार नाला साफ करीत नाही महानगरपालिकेच्या मलेरीया विभागाचे कर्मचाऱ्याकडून साफ सफाई करून घ्यावी.

मा. सभापती : कार्य. अभियंता श्री. पानझडे यांनी या बाबत खूलासा करावा.

कार्य. अभियंता(ड्रे.) : नाला सफाईचे एजन्सीधारक तसेच सर्व जेई यांनी कालच मी बैठक घेतली कामा बाबत माहिती घेतली १०० टक्के सफाई झाली नाही काम चालू आहे. जेंव्हा सर्व

पदाधिकारी यांनी पाहणी केली होती तेंव्हा नुकतीच कामे सुरू झालेली होती. ४० टक्के काम झालेले असून उर्वरीत काम चालू आहे.जेपर्यत चांगले काम करून देणार नाही तोपर्यत बील अदा केले जणार नाही. ५० लक्ष रक्कमेत २४ टेंडर केलेले होते. एक वगळता सर्व नाल्याची साफसफाईचे काम चालू असून श्री. बोराडे ठेकेदार यांनी १५ ते २० टक्केच काम केले वारंवार सूचना देवून सूध्दा काम करीत नाही. त्यामूळे त्यांचे कार्यवाही करणार आहे.

श्री.अ.रशिद खॉन :महापालिकेने जेसीबी नवीन मशीन खरेदी केले दुसऱ्याच दिवशी वर्कशॉपवर दुरूस्तीसाठी गेले. यासंबंधी खुलासा घेण्यात यावा.

मा. सभापती : संबधीत अधिकारी उपस्थित नाही. पूढील बैठकीत याचा खूलासा देण्यात यावा.

श्री.मोहन मेघावाले :खाजगी ठेकेदारामार्फत हडको सिडको व शहरातील काही भागात साफसफाईचे काम केले जते ते बरोबर होत नाही. तसेच औषध फवारणीसाठी मोठा खर्च करून फॉगींग मशीन खरेदी केले परंतू कूठेही फवारणी होत असल्याचे दिसून येत नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी : एकूण ३३ फॉगींग मशीन असून पाच नादुरूस्त व २८ सद्य:स्थितीत चालू आहे. सर्व वार्डसाठी वाटप केलेल्या असून जेंव्हा मा.महापौर यांनी समन्वय समितीची बैठक घेतली त्यावेळीही आरोग्य विभागाचे पर्यवेक्षण कमी पडते कारण पर्यवेक्षक नाहीत. म्हणून ही सर्व यंत्रणा वार्ड अधिकाऱ्याच्या कडे देण्यात यावी असा निर्णय झाला होता. त्यानंतर कार्यवाही होत आहे.

श्री.मधुकर सावंत : फॉगींग मशीनद्वारे कोणकोणत्या वार्डात फवारणी होते आहे व झालेली आहे याची माहिती द्यावी.

आरोग्य वैद्य.अधिकारी :मध्यंतरी डिझेलची अडचण होती. आता सकाळ व सध्याकांळ एक एक तास किमान फॉगिंग केली जत आहे.

मा.सभापती : ज्या वार्डात फवारणी झाली नाही तेथे मशीन पाठवून त्वरीत फवारणी करून घ्यावी.

श्री.मोहन मेघावाले : साफसफाईसाठी जेठेकेदार आहे त्यांचेकडे फवारणी मशीन असणे आवश्यक आहे. औषधी किती प्रमाणात टाकली जतात जेणे करून मच्छर नष्ट होवू शकतो. सुध्दा तपासले पाहिजे संबंधीत ठेकेदारास काळ्या यादीत टाकावे.

श्री.वसंत नरवडे : शहरात औषध फवारणी करून मच्छर कमी होत नाही. ज्या ठिकाणी खुल्या जगा. गटारी. नाले, संडास चेंबरजवळ तसेच गाजर गवत जांली झाडे असतात यांचे आसपास ओल्या ठिकाणी मच्छर मोठे प्रमाणात वाढलेले असून औषधाचा परीणाम त्यांचेवर होत नाही. शहरात गॅस्ट्रोची लागण सुरू झाली. डेंग्यू सारखे रोगाची सुरूवात झाली. या डासांवर आतापासून नियंत्रण करण्यासाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच जे कर्मचारी औषध फवारणी करतात ते सकाळी ७ वा. येतात १० ते १२ लोकांच्या सहया घेवून एका फेरीचे काम संपवितात. नगरसेवकांना विचारतात, डासांची पैदास कोठे जस्त होते. एक दोन तास काम करून हे कर्मचारी स. ९ वाजेपर्यंत आपआपल्या घरचे कामांस तयार राहतात. त्यांचेकडून काम करून घेणारे आरोग्य विभागाचे कूणीही सक्षम अधिकारी नाही. गाजर गवत काढावे तोपर्यत डासाचे निर्मुलन होणार नाही.

आरोग्य वैद्य. अधिकारी : या कर्मचाऱ्यांनी सूर्योदयापुर्वी एक तास फवारणी करायला पाहिजे त्यानंतर त्यांनी बिटेक्स चे स्प्रेयींग करावे. ॲन्टीमा शुटो रेसींडेसीयंल स्प्रेयींग आहे. घरात फॉगींग करतांना घरातील लोकांनी बाहेर जवे व आतून दार व खिडक्या सर्व बंद

करून फवारणी करून पाच ते दहा मिनिटे ठेवायला पाहिजेत्यामूळे मंच्छरवर परीणाम होतो.

श्री.मोहन मेघावाले :दोन चाकी वाहनावर कर्मचारी बसून फॉगींग करतात ही पध्दत बरोबर नाही.प्रत्येक वार्डात किती दिवसाला फवारणी होईल याचे नियोजन करावे.

मा. सभापती : उद्यापासून घरांमध्ये औषध फवारणी मोहिम राबवावी.

श्री.वसंत नरवडे : एक लिटर डिझेल दिले जते १० ते १५ मिनिटांत एक दोन गल्ल्या फवारणी होताता त्यामूळे इतर ठिकाणी मच्छरास बसण्यास जगा मिळते केलेल्या कामावर पाणी पउते त्यासाठी १० ते १२ मशीन एकदाच एका वार्डात एका भागात पाठवून फवारणी केली तर यास आळा बसेल.

मा. सभापती : डिझेल वगैरे वाढवून कसे देता येईल या संदर्भात या विभागाची उदयाच माझ्या दालनात बैठक घेवून योग्य ते नियोजन केले जईल.

श्री.मधुकर सावंत : माझ्या वॉर्डात चार पाण्याच्या टाकी असून बऱ्याचदा टाकी भरून ओव्हरफ्लो होतो. घरात पाणी जते. प्रशासनाने काळजी घेतली नाही. बाजूला रमानगर भाग आहे नागरीकांच्या घरात पाणी गेलेले आहे. घरे चांगली असल्याने आतापर्यत जीवीत हानी झालेली नाही. अनेक वेळा सुचना करूनही ओव्हरफ्लो होणारे पाणी काढण्याची व्यवस्था झालेली नाही.मागिल वर्षी टाकीभरून जस्तीचे पाणी वसाहतीत गेल्यामूळे तेथील नागरीकांनी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना मारहाण केली तसेच कार्यालयाच्या काचेची तोडफोड केली होती. व यामूळे सदर कर्मचारी यांनी महापालिका प्रशासनाकडे पत्र देवून आमच्या जिवीतास धोका आहे . टाकीचे ओव्हर फ्लो होणारे पाणी जण्यासाठी व्यवस्था करावी तरी सूध्दा काहीही कार्यवाही केली नाही. गेल्या महिन्यात पून्हा घटना घडली नागरीकाच्या घरात पाणी गेले. प्रशासनाने अदयाप काहीही कार्यवाही केली नाही. दि. ९.१०.२००६ ला ओव्हरफ्लो काढणेसाठी पत्र दिले होते. आतापर्यंत कार्यवाही झाली नाही.

कार्य.अभियंता(पापू.) :स. सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे मागिल महिण्यात पहाटे चार वाजता घटना घडलेली होती. मागिल वर्षी पण अशी घटना घडली होती त्यावेळी ओव्हर फ्लो काढला होता. टाकीतील जस्तीचे झालेले पाण्यास रस्ता करून दिला होता. पडलेलीभिंत बाधलेली होती आता पून्हा जेंव्हा भिंत पडली त्यावेळी पूर्ण टाक्याचे इनलेट आऊटलेट तसेच ओव्हर फ्लो काढलेले आहे. दुसऱ्यादां असे झाले म्हणून शासकीय अभियांत्रिकी महाविदयालस पत्र दिलेले आहे.आता ते डिझाईन करीत असून पडलेली भिंत तिचीही मार्टर आणि टेस्ट केलेली असून याचा अहवाल चार पाच दिवसात येईल. त्यानंतर काम करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :कर्मचाऱ्यांनी रिपोर्ट दिला असतांना प्रशासनाने ओव्हर फ्लो काढण्याची कार्यवाही केली नाही अधिकाऱ्यांची चूक असतांना उलट त्यांनाच दोषी ठरवून निलंबीत करण्यात येते, हे बरोबर नाही.

श्री.मधुकर सावंत : एक महिन्यापूर्वीच काम सूरू करणार होते केले नाही. अनेक वेळा तेथील कर्मचारी यांनी ओव्हरफ्लो काढण्यासाठी प्रशासनास विनंती केली. यात अधिकाऱ्याचा दोष असतांना कर्मचाऱ्याना दोषी ठरवून निलंबीत व इतर कार्यवाही केली जते. आज्ही काही कर्मचारी निलंबीत आहे.कामावरून कमी करूनही ते

कर्मचारी तेंव्हापासून काम करतात ५० टक्केच पगार दिला जतो. □सावळा गोधंळ आंधळा कारभार□ किती दिवस चालणार आहे. अधिकाऱ्यांची चूक असतांना कर्मचाऱ्यांना शिक्षा होते हे बरोबर नाही.

मा. सभापती : कर्मचारी कामावर आहे की नाही खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू.) : सदर कर्मचारी यांना निलंबीत करण्यात आलेले होते त्याची एक एक वेतनवाढ बंद करून कर्मचारी नव्हते म्हणून त्यांना पून्हा कामावर घेण्यात आलेले असून तशी ताकीद दिलेली आहे. त्यांना कामावर घेण्यासाठी मा. आयुक्तांची संचिकेवर पूर्वीच सही झालेली आहे.

श्री.मधुकर सावंत : (कर्मचारी यांनी प्रशासनाला दिलेले पत्र वाचून दाखवितात.) कर्मचाऱ्यांनी रिपोर्ट दिल्यानंतरही कार्य. अभियंता यांनी कार्यवाही केली नाही. काही घटना घडल्यास कर्मचाऱ्याना दोषी ठरवून त्याचेवर कार्यवाही केली जते हे बरोबर नाही.

मा. सभापती : सदर ठिकाणी मी प्रत्यक्ष पाहणी केली होती. प्रशासनाला सूचना दिलेल्या आहे तात्काळ ओव्हर फ्लो काढण्याची कार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खॉन : पाण्याची टाकी किती दिवसानंतर साफ केली जते.साफसफाई करतांना चूना किंवा इतर कशाचा उपयोग केला जतो.

कार्य.अभियंता(पापू.) :सहा महिण्यातून एकदा टाकी साफ करायला पाहिजे परंतू १ ते २ वर्षानंतर टाकी साफ केली जते.

श्री.अ.रशिद खॉन : सिध्दार्थ उद्यानची टाकी तीन वर्षापासून धुतलेली नसून त्यावर झाकण नाही. अशा अनेक टाक्या कित्येक दिवसापासून धुतलेल्या नाही त्यांचेवर झाकण नाही. कूणी यात विषारी औषधी टाकल्यास कोण जबाबदार असणार आहे. ३ ते ६ महिन्यातून एकदा टाकी साफ करून चूना लावावयास पाहिजे टाकीमध्ये जंतू निर्माण होत आहे. याकडे लक्ष दिले जत नाही. तातडीने टाक्या धुण्याचे आदेशीत करावे.

मा. सभापती : प्रत्येक टाकी दर सहा महिण्यातून एकदातरी साफ करण्यात यावी आतील भागास चूना वगैरे लावण्याची कार्यवाही करून ज्या टाक्यावर झाकन नाहीत ते लावण्याची कार्यवाही करावी.

श्री.मुधकर सावंत : माझ्या प्रभागात पाण्याच्या टाकीमध्ये सद्यस्थितीत तीन फुटाचा गाळ साचलेला आहे.केंव्हा टाकी साफ केली हे सूध्दा प्रशासनाला माहिती नाही अशी परीस्थिती आहे याकडे संबधीत अधिकारी दुर्लक्ष करतात.नागरीकाच्या जीवनाशी प्रशासन खेळत आहे असा याचा अर्थ होतो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आजच त्या टाकीची आपण पाहणी करू अशी परीस्थिती असेल तर नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते.

कार्य. अभियंता(पापू) :शट डाऊन केल्या शिवाय टाकी साफ करता येणार नाही.

श्री.अ.रशिद खॉन :तत्कालीन आयुक्त यांचे कार्यकाळात दर सहा महिण्याला टाकी साफ केली जत असे.

श्री.संजय जेशी : अनेक वेळ लोड शेडींग होते पाणी पूरवठा नियमीत वेळेत होत नाही.लोड शेडीग असते का दुसऱ्या कामासाठी लोंड शेडींगचे कारण दाखवून पाणीपूरवठा वेळेवर दिला जत नाही. किती तास लोंड शेंडीग होते पाणी पुरवठयाच्या संदर्भातील काही कामे असल्यास तसे जतेला स्थानिक वृत्तपत्रात प्रसिधदी देवून माहिती द्यायला पाहिजेजेणे करून नागीरक पाणी साठवून ठेवतील.

मा.सभापती : उद्या सकाळी सदर टाकीची पाहणी करण्यात येईल. प्रशासनाने या बाबतीत योग्य ती तातडीने कार्यवाही करावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : तास दोन तास चर्चा होते. अधिकारी सहजपणे उडवाउडवीची उत्तरे देतात. माझे वार्डात सयाजी कॉलनी भागात नगरपालिकेच्या काळातील एक इमारत असून ती महापालिकेच्या मालकीची असावी म्हणून निदर्शनास आणून दिले त्या भागात दाट लोकवस्ती आहे. दवाखाना सुरू करावा म्हणून संबधीत अधिकारी यांना पत्र दिले कर्मचारी वर्ग नाही म्हणून उत्तर दिले जते. असे असेल तर इमारत कशासाठी बांधून ठेवली असा प्रश्न निर्माण होतो.इमारत कूठे आहे ती हस्तांतर केलेली नाही असे उत्तर एका विभागाकडून मिळते. लाईटचे खाजगी एजन्सीला काम दिले. वेळेवर लाईटची व्यवस्था होत नाही. ही परीस्थिती गुत्तेदारी वाढल्यामूळे झालेली आहे असे माझे मत आहे. पाणीपुरवठयाची हीच परीस्थिती आहे. अनेक भागात ड्रेनेजचे घाण पाणी येते.याची खंत अधिकाऱ्याना नाही. नगरसेवकांच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असतील बरोबर नाही. त्यांचेवर प्रशासनाचा तसेच सभागृहाचा वचक नाही. या इमारतीमध्ये एका मुस्लीम समाजच्या व्यक्तीने अतिक्रमण केले आहे. तेथे लग्नाचे मंडपाचे सामान तो व्यक्ती ठेवतो. सदर इमारत महापालिका केंव्हा हस्तांतर करून घेणार आहे, याचा खूलासा करावा.

प्र.मालमत्ता अधिकारी : स्वत: पाहणी करून मालमत्ता विभागाच्या ताब्यात सदर इमारत आलेली आहे किंवा काय खात्री करून घेतली जईल ताब्यात नसेल तर उदया सदर इमारत ताब्यात घेण्यात येईल.

मा. सभापती : या संदर्भात स. सदस्य श्री.दाभाडे यांना माहिती देवून त्याची एक प्रत मलाही देण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मुथीयान कॉर्नर येथे घोरपडे नावाच्या व्यक्तीने महापालिकेच्या जगेवरील संरक्षित भिंत तोडून अनधिकृत पणे इमारतीचे काम केलेले आहे.मागिल बैठकीत हा मुद्या उपस्थित केला होता तसेच माहितीच्या अधिकारात मी माहिती मागविली होती अदयाप दिलेली नाही. वारंवार सूचना करूनही याकडे दुर्लक्ष केले जत आहे.आठ दिवसात माहिती दिली नाही तर संबधीत अधिकाऱ्याच्या विरोधात न्यायालयात दाद मागावी लागेल.

मा. सभापती : संबधीत अधिकारी यांनी स.सदस्य श्री.दाभाडे यांना आठ दिवसाच्या आजमाहिती द्यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : १९८८ साली ५४ लक्षचे जकात चोरी प्रकरण झाले होते. संजय पवार म्हणून लिपीक होते मीसुध्दा होतो तसेच श्री.एसके मतीन, श्री. गायकवाड असे एकूण १८ कर्मचारी होते. मुंबई, औरंगाबाद ॲन्टी करप्शन विभागाने संयुक्त कार्यवाही करून सेन्ट्रल नाक्यात वर धाड टाकली होती. त्यावेळी अतिरीक्त पोलीस अधिक्षक श्री.पी.एन. शर्मा यांनी महानगरपालिकेचे ३४ बूक जप्त केलेले होते. आठ जकात बूक मध्ये पाच रू. पावती ही नव्हती. त्यांचेकडे जेरेकॉर्ड होते त्यावर दोन ते अडीच लक्षच्या पावत्या होत्या. जेंव्हा रेकॉर्ड घेवून गेले तेंव्हा त्यांनी पोचपावती त्यावेळचे जकात अधिक्षक श्री.वाय.आर.अभंग यांचेकडे दिली होती. या संदर्भात दि. २.६.२००७ रोजी जकात अधिक्षक यांना पत्र देवून ५४ लक्ष वसूलीच्या संदर्भात माहिती विचारली असता सदर पावती बुक अदयाप ॲन्टी करप्शन विभागाने या

कार्यालयास जमा केलेली नसल्याचे मला पत्राद्वारे कळविले आहे. व हे रेकॉर्ड मिळाण्यासाठी पत्रव्यवहार चालू आहे असे म्हटले आहे.१९ वर्षापासून रेकॉर्ड मागवित आहोत. रेकॉर्ड नाही म्हणून त्या वर्षाचे ऑडीट करणे बाकी राहिले असेल महापालिकेकडे या संबधीचे रेकॉर्ड केंव्हा येणार आहे खूलासा घेण्यात यावा. जेत्यात गुंतलेले कर्मचारी होते त्यांना प्रमोशन देण्यात येत आहे हे कितपत योग्य आहे. कार्यवाही होणार का? जक्कात अधिक्षक यांनी पुढील सभेत तयारीने यावे.

मा. सभापती : प्रकरण मोठे आहे. पूढील बैठकीत संबधीत अधिकारी यांनी या सभागृहात माहिती द्यावी.

श्रीमती जयश्री किवळेकर :दिं. २९.५.०७ च्या बैठकीत जेमुद्दे उपस्थित केले होते त्याच मुद्यावर पुन्हा आज चर्चा झाली. अमलबजवणी करण्याचे आदेशीत केले कोणत्या प्रकरणात अमलबजवणी झालेली आहे याची माहिती घेण्यात यावी. शहरात डासाचे प्रमाण वाढले नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते. नाल्याची साफसफाई करणे, गाजर गवत निर्मुलन, रस्त्याच्या कडेला असलेले गवत, झाडेझुडपे, ३६० ओपन स्पेस वरील साफसफाई, ५७ खेळाचे मैदान, ३६ उद्यान या बाबतीत कार्यवाही करण्यासाठी महापालिकेने काय पॉलीसी ठरविलेली आहे. सभागृहात अनेक विषयावर चर्चा होते. कार्यवाहीचे आदेश होतात अमलबजवणी होत नाही.मागिल बैठकीत अतिक्रमणाच्या संदर्भात आपण रूंलीग दिली होती त्या बाबतीत अमलबजवणी केलेली नाही.वार्ड अधिकारी यांना अतिक्रमणाच्या संदर्भात अधिकार दिले पून्हा काढून घेतले. झोन कार्यालयास कळविले सूध्दा नाही व मुख्य कार्यालयाकडूनही अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली नाही.

उप आयुक्त(प्र.) : अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकामबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार वार्ड अधिकारी यांना देण्यात आलेले होते.सभागृहात याबाबत चर्चा झाली सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठीच हे प्रकरण पाठविलेले आहे. तथापी या बाबत वार्ड अधिकाऱ्यांना जेअधिकार दिलेले होते ते अधिकार अद्याप काढून घेतलेले नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर : अतिक्रमण काढण्याची कार्यवाही झोनकडे दिली होती ती थांबविलेली आहे.लेखी काहीही दिलेले नाही .त्यामूळे वार्ड ई कार्यालया अंतर्गत येणाऱ्या भागातील अतिक्रमणे काढलेली नाही.

उपआयुक्त (प्र.) : वार्ड इ कार्यालयातील अनेक अतिक्रमण काढण्याची कार्यवाही झालेली असून त्याचा अहवाल माझ्याकडे आलेला आहे.अतिक्रमणाचे काम वार्ड अधिकारी यांनीच हाताळावे असे परत आदेश दिले जतील.

शहर अभियंता : सिडको हडको भागातील खुल्या जगावर संरक्षित भिंत नाही. दर वर्षीच्या बजेट प्रमाणे संरक्षित भिंत करण्याचे काम करीत आहोत. खुल्या जगेवर सद्या गाजर गवत व इतर झाडे झुडपे आहेत ती तोडून जेसीबी मशीनने लेव्हल व स्वच्छ केले जईल.

श्रीमती जयश्री किवळेकर : एक वर्षात काहीही केलेले नाही. माझ्या वार्डात संरक्षित भिंत असलेल्या सात जगा तसेच खुल्या ९ जगा असून गेल्या दीड वर्षात कुठेही साफसफाई केलेली नाही.

मा.सभापती : सिडको हडको भागात ज्याही खूल्या जगा आहेत त्यावरील साफसफाई १५ दिवसात करण्याची कार्यवाही करावी जगे करून अतिक्रमण होणार नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे :मुथियान कॉर्नर महापालिकेच्या जगेवरील संरक्षित भिंत तोडून अतिक्रमण झाले त्यांचेवर अदयाप का ॲक्शन घेतलेली नाही.

शहर अभियंता : अनेक वर्षापूर्वी मुथीयान कॉर्नर येथे महापालिकेची जगा म्हणून संरक्षित भिंत करण्यात आली होती. संबधीत व्यक्ती श्री. घोरपडे यांची तेथे जगा होती नगररचना विभागाने त्यांना समोरच्या जगेवर परवानगी दिली त्यांचे समोर ती कुंपणभिंत होती ती सरंक्षित भिंत पाडलेली आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अधिकारी दिशाभूल करीत आहेत. नगरपालिकेची जगा होती सर्वे नंबर ५ होता सर्वे न. ६ मध्येजगा कशी गेली.१९८३ मध्ये संबधीत व्यक्तीने कशाची रक्कम घेतली होती.त्या जगेवर संरक्षित भिंत होती गेट होता. एकीकडे जगा दिली जते. व दुसरीकडे मोबदलाही दिला जतो.माहितीच्या अधिकारात १४.६.२००६ रोजी माहिती मागविली अदयाप दिली नाही.लेखा विभागाकडे चेक नंबर नाही.

मा. सभापती : एक स. सदस्य माहितीच्या अधिकारात माहिती मागतात त्यांना वेळेवर दिली जत नाही हे बरोबर नसून त्या बाबतीत काय नियम आहे खूलासा करावा.

उपआयुक्त(प्रशासन) :३० दिवसाच्या आत माहितीच्या अधिकारात उत्तर देणे आवश्यक आहे दिले नाही तर अपील करावे लागते व वेळेत न दिल्यास प्रत्येक दिवसाला २५० दंडात्मक कार्यवाही होते.

मा. सभापती : पूढील बैठकीपर्यत संबधीत अधिकारी यांनी स.सदस्य श्री.दाभाडे यांना माहितीच्या अधिकारात मागविलेली माहिती देण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :आताच सिडको हडकोतील खुल्या जगावरील साफ सफाई करण्याचे आश्वासन शहर अभियंता यांनी दिले.सिडको हडको भागात आज्ही ७५ टक्के लाईट बंद असून संबधीत एजन्सी निषकाळजीपणे काम करीत असून नुकतेच काही दिवसापूर्वी सोनवणे नावाचा एका मुलाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. माझ्या वार्डात गोदावरी पब्लींक स्कूलच्या रस्त्याने अंधाराचा फायदा घेवून एका महिलेचे मंगळसुत्र चोरटयाने पळविले होते लोकांनी धाव घेतली म्हणून मिळाले. आज्ही वार्डात ७५ टक्के लाईट बंद आहे. त्याबाबतीत काय ठोस निर्णय घेणार आहे.

मा. सभापती : जर संबधीत एजन्सी वेळोवेळी लाईट लावत नसेल तर सदर एजन्सीवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

<u>विषय क्र.34 :</u>

दिनांक **27/12/2006**(का.प.क्र.16),दिनांक **12/01/2007**(का.प.क्र.16) रोजी झालेल्या व दिनांक **29/5/2007**(का.प.क्र.03) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>ठराव :</u>

दिनांक **27/12/2006**, दि.**12/01/2007** रोजी झालेल्या व दि. **29/5/2007**रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

<u>विषय क्र.35 :</u>

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.महूनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे दरसूची सन 2005-06 नुसार तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रू.14,99,920/- च्या कामासाठी सर्वसाधारण सभेची दि.11-8-2006 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सदर कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन 2006-07 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानातून प्रस्मावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता दर भरून प्राप्त झालेली पाच निविदापत्रके खालील प्रमाणे.

1. श्री.मुबारक महेबुब पठाण 23.234% कमी दराने

2.	श्री.काझी मो.मुबरीजोद्दीन	16.349% कमी दराने
3.	मे.एल.के.कन्स्ट्रक्शन	14.99% कमी दराने
4.	श्री.विजय व्ही.मालोदे	8.75% कमी दराने
5.	मे. सत्यम कन्स्ट्रक्शन	10.00% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.मुबारक महेबुब पठाण यांची असून ती अं.प.दरापेक्षा 23.234% कमी दराची आहे. करीता श्री.मुबारक महेबुब पठाण यांची अं.प.दरापेक्षा 23.234% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.संजय जेशी : २३.२३४ टक्के कमी दराने काम करणार आहे. चांगले काम होईल का पुन्हा पूर आला तर ती भिंत पडू नये. पून्हा आरोप प्रत्यारोप सूरू होतात. काम द्यायचे असेल तर अधिकाऱ्यांच्या जबाबदारीवर द्यावे नसता रिकॉल करावे.

मा. सभापती : सदर कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात.

ठराव :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र.36 :

शहर अभियंता, मनपा औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, कलाई महिला विकास बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद यांना एन-7 म्हाडा कॉलनी, जिम्नॅशीयम हॉल ज्याचे क्षेत्रफळ 205.72 चौ.मी. असून पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे. स्थायी समिती सभा दि.16.1.2007 रोजी ठराव क्र.207 नुसार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी नेहमीच्या अटी शर्तीवर मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधीत संस्थेस एन-7, म्हाडा कॉलनी येथील जिम्नॅशीयम हॉलसाठी रू.1000/- प्रति माह भाडे व अनामत रक्कम रू.12000/- आकारण्यात येणार आहे.

तसेच वरील जागा करीता सेवा शुल्क म्हणून रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह व जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो संबंधीत संस्थेने भाड्याच्या व्यतिरिक्त भरणा करावा लागेल. या कार्यालयास ज्यावेळी इमारतीची आवश्यकता वाटेल तेव्हा सदरील इमारत महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येवून हॉल भाड्याने देण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कलाई महिला विकास बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद यांना एन-7 म्हाडा कॉलनी, जिम्नॅशीयम हॉल पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी रू.1000/- प्रती माह प्रमाणे संबंधीताकडून अनामत रक्कम रू.12,000/- तसेच सेवा शुल्करू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे आकारणी करून नेहमीच्या अटी-शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.37 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.7 भिमनगर, भावसिंगपुरा नाल्यातील मुख्य ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणेच्या कामासाठी म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2005-06 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रू.12,77,505/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.27.2.2007 ठराव क्र.264 अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार या कामांसाठी निविदा मागविण्यात आल्या असता

निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

1.	श्री. जाधव ए. एम.	2% जास्त दराने
2.	श्री.शेख सलीम मोहिनोद्दीन	3% जास्त दराने
3.	मे.एल.के.कन्स्ट्रक्शन	7% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आणि अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% जास्त दराची श्री.जाधव ए. एम. यांची आहे. मा.आयुक्तांनी वाटाघाटीअंती 2% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा 1% कमी दराने निविदा मंजुरीस्तव स्थायी समितीकडे सादर करण्याची शिफारस केली आहे. तरी श्री.जाधव ए.एम. यांची अं.प.दरापेक्षा 1% कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.7 भिमनगर, भावसिंगपुरा नाल्यातील मुख्य ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री. जाधव ए. एम. यांचेकडून अं.प.दरापेक्षा 1% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 38 :

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीच्या तसेच महानगरपालिकेने शाळेसाठी भाडे तत्वावर घेतलेल्या इमारतींचे 50%प्रमाणे इमारत भाडे शासनाकडून अनुदान म्हणून मिळते. परंतु त्यासाठी शासनास विहित नमुन्यात माहिती सादर करणे आवश्यक असते. त्यानुसार एकूण 76 शाळांचे भाडे निश्चिती करून अनुदान प्राप्त होऊ शकते.

शासनास विहित नमुन्यात तांत्रिक माहिती सादर करणेस्तव सर्व शाळांचे मुल्यांकन करणे आवश्यक आहे. या विभागातील तांत्रिक कर्मचाऱ्यांचा व्याप पाहता सदरील काम बाहेरील एजन्सीकडून करून घेणेस्तव दरपत्रके घेण्यात आलेली आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	मे. सिमा कन्सल्टंट	श्री. सतीश गिरे
1.	सदरील एजन्सीने प्रत्येक शाळेचे मोजमाप करून नकाशे तयार करण्याकरीता रू.1000/- प्रती शाळा असे दर नमुद केलेले आहेत.	सदरील एजन्सीने प्रत्येक शाळेचे मोजमाप करून नकाशे तयार करण्याकरीता रू.800/- प्रती शाळा असे दर नमुद केलेले आहेत.

तथापी सदरील काम हे विहित मुदतीत करावयाचे असल्यामुळे दोन्ही एजन्सींना सम प्रमाणात कामाचे वाटप करून प्रति शाळा रू.800/- याप्रमाणे फिस देण्यात येणार आहे. मा.आयुक्त महोदयांनी शिफारस केल्यानुसार सदरील दोन्ही एजन्सींना त्याचे अंतिम देयक ही शासनाच्या मागणीनुसार मागविण्यात आलेली माहिती सादर केल्यानंतर त्यातील त्रुटी पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून अनुदान प्राप्ती अंती अदा करण्यात येईल.

त्यानुसार सदरील काम हे मे.सीमा कन्सल्टंट व श्री. सतीश गिरे यांचेकडून प्रति शाळा रक्कम रू.800/- प्रमाणे करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.संजय जेशी : शासनाकडून आजपर्यंत इमारतीचे भाडे मिळत आलेले आहे. आजपर्यंत शासनाकडून भाडे घेतले का कोणत्या पध्दतीने घेतले भाडे निश्चित करण्यासाठी प्रत्येक शाळेमागे ८००रू. देणार आहोत. डी.एस आर प्रमाणे किंवा जगेप्रमाणे थोडी

फार वाढ झाली असेल. पाच दहा मिनिटात जगेचे मुल्यमापन करता येते. ८०० द्यायचे सर्व अंतिम करून स्थायी समितीसमोर ठेवण्याचे कारण काय?

श्री.वसंत नरवडे : मालमत्ता विभागाने महापालिकेच्या मालकीच्या सर्व इमारतीना भाडे आकारले जते. शाळैपूरताच एजन्सी मार्फत का करायचे. मालमत्ता अधिकारी हे भाडे ठरवू शकत नाही का जेठरवतील ते प्रशासनाला मान्य नाही का अधिकारी महापालिकेचे नुकसान करणारे आहेत याचाही खूलासा व्हावा.

डॉ.आशा बिनवडे : सर्व शाळांचे विवरण महापालिकेकडे आहे. या शाळेच्या जगेचे व्हॅल्यूएशन काढून किती भाडे आकारावे साधे काम असून एखाद्या एजन्सीकडे हे काम द्यावे तेवढे मोठे काम वाटत नाही. आतापर्यत या शाळेचे भाडे शासनाकडून मिळवले नव्हते का नसेल मिळवले तर यास जबाबदार कोण आहे.मिळवले असेल तर हे काम महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून करावे. असा अवाजवी खर्च स्थायी समितीच्या मंजूरीसाठी आणणे योग्य नाही. हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रत्येक काम पीएमसीला देणार असेल तर महापालिकेचे अधिकारी काय काम करणार आहे. हा प्रस्ताव रद्द करावा.

कार्य.अभियंता(वि.ड्रे.) :२८.६.२००७ रोजी शिक्षणाधिकारी यांनी या विभागाला पत्र देवून कळविले की महापालिकेने शाळेसाठी भाडेने घेतलेल्या इमारतीचे भाडे निश्चित करण्यासाठी दिले होते. मागिल फॉरमेट मध्ये माहिती दयायची होती. ज्या जगेवर शाळा आहे त्या शाळेचे नाव क्षेत्रफळ किती आहे. त्याची किमंत किती त्यांचे व्हॅल्यूशन करायचे हे भाडे निश्चित केल्यानंतर शासनाकडून अनुदान मिळते. सर्वे करण्यासाठी कळविले होते.

डॉ. आशा बिनवडे : महापालिकेने शाळेसाठी किती इमारती भाडेने घेतलेल्या आहेत.

कार्य.अभियंता(विद्यु.) : याबद्दल माझेकडे माहिती नाही.

श्री.मो.जवेद मो.इसाक : ६० हजर खर्च होत आहे. शासनाकडून जस्त अनूदान मिळणार आहे मंजूरी द्यावी.

डॉ. आशा बिनवडे : आतापर्यत किती अनुदान आलेले आहे. मिळाले नसेल तर का मिळाले नाही अधिकाऱ्यांना माहिती नाही तर प्रस्ताव का आणला महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून हे काम करून घ्यावे. एजन्सीला देण्याची गरजनाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : पीएमसी नेमण्याची गरजनाही. महापालिकेने हे काम करावे.

मा. सभापती : पुढील बैठकीत संपूर्ण माहिती देण्यात यावी. तुर्त प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

ठराव :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 39 :

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत श्वानदंश रूग्णांना उपचार देण्यात येत आहे. या अनुषंगाने महानगरपालिका मार्फत श्वानदंश लस खरेदी प्रक्रीया पुर्ण करण्यात आली असून पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. श्वानदंश रूग्णांच्या उपचाराकरीता साधारणत: किमान 3 व्हायल ते कमाल 6 व्हायल श्वानदंश लसीची आवश्यकता असते. यासाठी शासनातर्फे रू.50/- एवढे शुल्क आकारले जाते.

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्वानदंश च्या उपचाराकरीता येणाऱ्या सर्व रूग्णांना (कोणताही अपवाद न वगळता) प्रती लस/व्हायल रू.50/-(प्रती व्हायल अक्षरी रूपये पन्नास फक्त) सेवा शुल्क आकारण्याच्या परवानगी करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.वसंत नरवडे : एजन्सी कोणती आहे कोण पुरवठा करणार आहे.

आरोग्य वैद्य.अधिकारी : याची निविदा प्रोसेस पूर्ण झाली असून इन्फेक्ट बाय फॉर्मा म्हणून मुंबई ची उत्पादक कंपनी आहे.२१८ रू.याची किमंत आहे. आतापर्यंत याचा वापर केलेला नव्हता. व कोणतेही सेवाशुल्क घेत नव्हतो. परंतू शासकीय महाविदयालय मध्ये जेदर आहे तेच प्रस्तावित केलेले आहे. सेवा शुल्क म्हणून रूग्णास द्यावे लागतील. जर रक्कम महापालिका फंडात जमा होईल. १००० घेतले तर २.१८ लक्ष खर्च लागेल.

मा. सभापती : मंजूरी देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा रूग्णालयात श्वानदंश च्या उपचाराकरीता येणाऱ्या सर्व रूग्णांना (कोणताही अपवाद न वगळता) प्रती लस/व्हायल रू.50/-(प्रती व्हायल अक्षरी रूपये पन्नास फक्त) सेवा शुल्क आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 40 :

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहराच्या ज्या भागात जलवाहिनी टाकण्यात आलेली नाही तसेच ज्या भागात जलवाहिनीद्वारे पाण्याचा पुरेसा पुरवठा होत नाही, अशा भागात महानगरपालिकेच्या व खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

सध्या टँकरद्वारे ज्या नागरीकांना पाणी 200 लिटर क्षमतेचा बॅरल एक दिवस आड भरून देण्यात येत आहे, त्यापोटी नागरिकांकडून प्रतिवर्ष रू.600/- प्रमाणे शुल्क आकारण्यात येत आहे. टँकरचा देखभाल/दुरूस्ती व इंधनावरील खर्च लक्षात घेता रू.600/- दराने प्रति बॅरल प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास महानगरपालिकेस नुकसान सोसावे लागत आहे. नागरिकांना नेहमी करीता टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी प्रति कुटुंब प्रति वर्षा प्रमाणे रूपये 1500/- शुल्क आकारण्यात आल्यास टँकर **ना नफा ना तोटा** या तत्वावर देता येईल.

तरी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी रू.600/- ऐवजी रू.1500/- प्रमाणे शुल्क आकारणी बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.हिम्मतराव दाभाडे : महानगरपालिकेच्या टँकर मधील डिजेल खाजगी वाहनामध्ये टाकले जते म्हणून मी प्रशासनाकडे पत्र देवून माहिती विचारली होती अद्याप माहिती दिली नाही. तसेच पाणी कोणत्या भागात दिले जते याची नोंद नसते. महापालिकेच्या रेकॉर्डलाच नोंद दिसून येते. बसल्या बसल्या पावत्या फाडल्या जतात. यात महापालिकेचे नुकसान होत असून नागरीकांना पाहिजेतेवढे पाणी दिले जत नाही.

श्री.वसंत नरवडे : धार्मिक कामासाठी या दराने पाणी दिले तर हा बंद करण्याचा प्रकार दिसतो कारण खाजगी टँकर हे २५०रू.मध्ये मिळते. धार्मिक कामासाठी वाढ करू नये.

मा. आयुक्त : ही वर्षासाठीची आकारणी आहे. खाजगी टँकर हे एक दिवसासाठी २५० रू. घेत असेल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : जेथे एक दिवसाआड म्हणजे सहा महिनेच पाणी दिले जते त्यांचेकडूनही १८००/- रू. घेणे योग्य नाही.

श्री. संजय जेशी : रू.१०००/- आकारणी करावी.

श्रीमती जयश्री किवळेकर : ज्या ठिकाणी जलवाहिन्या टाकलेल्या नाही तरीही महापालिकेचे कर्तव्य म्हणून त्या भागात टँकरद्वारे पाणी पूरवठा केला जतो. एक दिवसाआड २०० लिटर पाणी असे १८० दिवसाचे ६००-/ आकारणी करतो. परंतू अशा भागात गरीब लोक राहतात टँकर द्वारे होणारे पाणी वेळेवर दिल्या जत नसल्याने पाण्यासाठी घरातील एका व्यक्तीला कामधंदा सोडून रहावे लागते. व्यक्ती सकाळपासून संध्याकाळपर्यत वाट पहावी लागते.त्यासाठी ना नफा ना तोटा या पध्दतीने जस्तीची वाढ न करता २०० रू. ची वाढ करून हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ज्यांना चांगले घरदार आहे पाणीपट्टी दर वाढीचा प्रस्ताव आला होता त्यावेळी वाढ केलेली नाही गरीबासाठीही या प्रस्तावात वाढ करू नये. जे चोरून कर्मर्शियल कामासाठी पाणी घेत आहेत ते नळ कनेक्शन शोधावे. वसूली चांगली होईल. हा ठराव रद्द करावा.

श्री.संजय जेशी : गरीब श्रीमंत असा भेदभाव करण्याचा कूणी प्रयत्न करू नये. सगळयासाठी सारखाच विचार करावा. ज्या ठिकाणचे लेआऊट मंजूर आहे विकास खर्च भरला आहे. त्यांना पाणी दिले जत नाही. शहर आपले आहे सर्वांना पाणी देणे आपले कर्तव्य आहे. जलवाहिनी टाकू शकत नाही म्हणून त्या भागात टँकरद्वारे पाणी पूरवावे लागते. किती रक्कम वाढवायची हा प्रश्न आहे ८०० ते १०००रू. दरम्यान घेण्याचे मान्य करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कमर्शियल नळ कनेक्शन का शोधले नाही.

मा. आयुक्त : स्कीम करायला ३ वर्ष लागतील. आपण सुविधा देतो. सर्व्हीस चार्जेस घ्यावयास पाहिजे

श्री.वसंत नरवडे : माझ्या वार्डात एक दिवसा आड पाणी येते तरीही १८००रू. घेतले जते. एकदम १५०० रू. न वाढविता १०००रू. करण्यात यावे.

मा. सभापती : ६००रू. ऐवजी प्रती वर्ष ९००रू. घेण्यास मान्यता देण्यात येते.जर कूणी डिजेल विक्री करीत असेल तर त्यांचेवर कडक कार्यवाही करण्यात यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहराच्या ज्या भागात जलवाहिनी टाकण्यात आलेली नाही व ज्या भागात जलवाहिनीद्वारे पाण्याचा पुरेसा पुरवठा होत नाही, अशा भागात मनपाच्या व खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असल्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी रू.600/- ऐवजी प्रति कुटुंब प्रति वर्ष रू.900/- प्रमाणे शुल्क आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 41 :

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी वर्गासाठी आयडीया कंपनीची ग्रुप मोबाईल सेवा सुरू केलेली आहे. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.75 दिनांक 4-10-2005 अन्वये ग्रुप मोबाईल सेवेकरीता वार्षिक रू.10 लक्ष रक्कमेची मर्यादा असणे बाबत मान्यता प्राप्त झालेली आहे. दिनांक 16.1.2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये पाणी पुरवठा व विद्युत विभागातील सब ओव्हरसिअर व लाईनमन यांचा ग्रुप मोबाईल मध्ये समावेश करावा याबाबत चर्चा झाली. मा.सभापती, स्थायी समिती यांनी रूपये 10.00 लक्ष खर्चातच ज्या अधिकाऱ्यांना मोबाईलची आवश्यकता नाही त्यांचे मोबाईल पाणी पुरवठा व विद्युत विभागातील आवश्यक कर्मचाऱ्यांना देण्यात यावा, अगोदर या कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे अशा सुचना दिल्या आहेत. महानगरपालिकेकडून सध्या आवश्यक असलेल्याच अधिकारी व कर्मचाऱ्यांना वार्षिक 10.00 लक्ष खर्चाच्या मर्यादेत 128 सिमकार्ड देण्यात आलेले आहेत. पाणी पुरवठा व विद्युत विभागातील सब ओव्हरसिअर व लाईनमन तसेच वैद्यकीय अधिकारी, जकात अधिक्षक, जकात निरीक्षक व स्वच्छता निरीक्षक इत्यादी यांना सध्या सुरू असलेल्या आयडीया कंपनीच्या ग्रुप मोबाईल सेवेमध्ये समाविष्ट करावयाचे झाल्यास वार्षिक रूपये 4.00 लक्ष (अक्षरी रूपये चार लक्ष फक्त) खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च हा पुर्वीच्या वार्षिक 10.00 लक्ष मर्यादे व्यतिरिक्त जास्तीचा होणार आहे. करीता वाढीव वार्षिक रू.4.00 लक्ष खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.वसंत नरवडे : यापूर्वी १० लक्षच्या आत मोबाईल सुविधा देण्यास मान्यता दिली होती. त्यात कोणत्या अधिकाऱ्याना कर्मचाऱ्याना दिलेले आहेत व आता कूणास देणार आहोत. जे विद्युत लाईनमन तसेच पाणी सोडणारे कर्मचारी यांना देण्यात यावे व जे अधिकारी कर्मचारी १० ते ६ या वेळातच चालू ठेवतात इतर वेळात बंद ठेवतात अशांचे मोबाईल काढून घ्यावे.

डॉ.आशा बिनवडे : प्रत्येक कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना बाहेर फोन करण्याची काही मर्यादा आहेत का, ते आखून दिले पाहिजे १२८ सिमकार्ड कुणाकडे आहे. त्यांचे बिल किती येते.

मा. आयुक्त : मागिल महिण्याचे एकूण बिलाची प्रत आहे. ती सर्वांना देण्यात येईल.

श्री.मधुकर सावंत : ज्यांना कार्यालय सोडून फिरतीवर सेवा करावी लागते त्यांना देणे आवश्यक आहे. ज्या अधिकारी कर्मचाऱ्याना कार्यालयाचे बाहेर काम नाही त्यांचे काढून घेण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : अधिकारी कर्मचाऱ्यांना ग्रुप मोबाईल दिले गेले. कार्यालयातील बीएसएनएल चे दुरध्वनी आहेत त्याचे बिल किती येत आहे. ते तपासावे. त्याची माहिती पूढील बैठकीत देण्यात यावी.

श्री.मधुकरसावंत : हा प्रस्ताव स्थगित ठेवावा. कोणत्या अधिकाऱ्याकडे किती बिल आले सर्वाचे बिल मागवावे. त्यानंतर यावर निर्णय घ्यावा.

कार्य.अभियंता : १० लक्षच्या मर्यादेत एकूण १२९ सीमकार्ड वाटप केले आहे त्यात कार्य. अभियंता यांना ७५० उपअभियंता यांना ६०० तर क. अभियंता यांना ५०० तसेच लाईनमन यांना ३०० प्रतिमहा रू.पर्यतचे बीत अशी मर्यादा घालून दिलेली आहे. आजच्या प्रस्तावानूसार एकूण ६५ सीमकार्डची मागणी आहे यात दुय्यम अवेक्षक, लाईनमन, वैद्यकीय अधिकारी आहेत जकात निरीक्षक व अधिक्षक यांना यापूर्वी बीपीएल मोबाईल दिले होते त्यांना ग्रुप मोबाईल मध्ये समावेश करण्यासाठी एकूण अतिरिक्त ४ लक्ष रू. खर्च अपेक्षीत आहे.

श्री.संजय जेशी : ज्यांचे मोबाईल बंद असतांत त्याबध्दल कूणाला सांगावे. प्रशासनातील एक प्रमुख अधिकारी नियुक्त करावे.

मा. सभापती : ज्यांचे मोबाईल बंद असेल त्यांचे बाबतीत तक्रार कार्यकारी अभियंता पाणीपूरवठा यांचे कडे करावी. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा व विद्युत विभागातील सब ओव्हरसिअर व लाईनमन तसेच वैद्यकीय अधिकारी, जकात अधिक्षक, जकात निरीक्षक व स्वच्छता निरीक्षक इत्यादी यांना सध्या सुरू असलेल्या आयडीया कंपनीच्या ग्रुप मोबाईल सेवेमध्ये समाविष्ट करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या वार्षिक र.रू.4.00 लक्ष च्या वाढीव खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 42 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.67 मो.बौध्दनगर परिसर तसेच पंचशीलनगर येथे 225 व 250 मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2005-06 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले. र.रू.28,61,800/- च्या कामाचे अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.13-10-2006 मध्ये विषय क्र.516 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मनपास प्राप्त अनुदानातून हे काम करणेस व अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.2006/नपाप्र/मनपाऔ/दाविसुयो/कावि/36 दिनांक 2.1.2006 अन्वये प्रस्तुत काम नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत करणेसाठी देखील मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार निविदा सूचना क्र.90/07 दि.20.1.2007 अन्वये या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजे अं.प.दरापेक्षा 29.99% कमी दराची निविदा मे.एस.बी.कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झाली होती. त्यास मान्यतेसाठी स्थायी समिती सभा दि.30.3.2007 रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आले असता 29.99% कमी दराची निविदा मंजूर झाली नाही आणि फेर निविदा काढण्याचे आदेशीत करण्यात आले. त्यानुसार निविदा सूचना क्र.10/2007 दि.9.5.2007 रोजी फेर निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त निविदांचे दर दर्शविणारा तक्ता इ-टेंडर विभागाकडून दि.16.6.2007 रोजी प्राप्त झाला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1.	मे. एस. बी. कन्स्ट्रक्शन	22% कमी दराने
2.	मे. उदय इंजिनियरींग वर्क्स	18% कमी दराने
3.	श्री. संतोष रत्नाकर झाल्टे	11.88% कमी दराने
4.	मे. ड्रीम लँड कन्स्ट्रक्शन	11% कमी दराने
5.	मे. एस. ए. कन्स्ट्रक्शन	7.86% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आणि अं.प.दरापेक्षा 22% कमी दराची निविदा मे.एस.बी. कन्स्ट्रक्शन यांची आहे. इ-टेंडर विभागाकडून प्राप्त झालेल्या तुलनात्मक दराच्या तक्त्यावर मे.एस.बी. कन्स्ट्रक्शन यांचे 22% कमी दरास मा.आयुक्तांची शिफारस आहे. तरी मे.एस.बी. कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 22% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

मा. सभापती : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. या कामापुरते विशेष बाब म्हणून सुरक्षा अनामत न घेता 2% अनामत रक्कम घेऊन कार्यादेश द्यावेत.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.67 मो.बौध्दनगर परिसर तसेच पंचशीलनगर येथे 225 व 250 मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 22% कमी दराची मे. एस. बी. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस व 22% कमी दराची निविदा असल्याने या कामापुरते विशेष बाब म्हणून सुरक्षा अनामत न घेता फक्त 2% अनामत रक्कम भरणा करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 43 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरातील महत्वाचे विकास योजना रस्ते तसेच चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील काही मुख्य रस्ते यांचे डांबरीकरण करून सुधारणा करणे या कामासाठी रू.60.00 कोटीचा रस्ते विकास कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे. सदर रस्ते विकास कार्यक्रमात अंतर्भूत असलेले रस्ते प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करून करण्याचे प्रायोजित आहे. याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळातील मान्यताप्राप्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) यांना दि.21.4.2007 रोजी मा.आयुक्त यांचेकडे चर्चेसाठी बोलाविण्यात आले होते. चर्चेकरीता खालील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार हजर होते.

अ.क्र.	PMC चे नांव	फीस दर
1.	Darsch Gruppe(D.C.India)	3.50 टक्के
2.	Sangrace Engineering Project Private Limited	3.50 टक्के
3.	Technogem Consultant Private Limited	2.50 टक्के
4.	Gherazi Estern Limited	2.50 टक्के
5.	Shrikhande Consultant Private Limited	2.50 टक्के

Technogem Consultant Private Limited, Gherazi Eastern Limited व Shrikhande Consultant Private Limited यांनी एकूण प्रकल्प खर्चाच्या 2.50 टके एवढी फिस व प्रचलित दराप्रमाणे महाराष्ट्र शासनाचा Service Tax(12.36%) अतिरिक्त आकारून काम करण्यास संमती दर्शविली. श्रीखंडे कन्सल्टंट हे इतर कामात महानगरपालिकेचे PMC म्हणून काम पाहात असल्याने मा.आयुक्त यांनी Technogem Consultant Private Limited,Thane व Gherazi Eastern Limited, Mumbai यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून 2.50 टक्के फिस या दरास शिफारस केलेली आहे. सदर 2.50 टक्के फिस खालील प्रमाणे देण्यात येईल.

अ.क्र.	निविदापूर्व कामे	फीस टक्के (एकूण निविदा रक्कमेच्या)
1.	रस्त्याचे सर्वेक्षण करणे, रस्त्याचे Cross व Longilutinal Section काढणे. IRC व IS कोडप्रमाणे रस्त्याचे डिझाईन करणे, रहदारी घनता काढणे, कामाचे स्पेसिफिकेशन देणे, कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, निविदा पुस्तीका तयार करणे व पुरविणे, निविदा पूर्व बैठकीस सहभाग करणे, निविदा उघडल्यानंतर दराबाबत निविदेचे Evaluation करणे, निविदेबाबत शिफारस इत्यादी.	1 टक्के
2.	कार्यादेश दिल्यानंतर कामावर देखरेख ठेवणे, दैनंदिन प्रगती अहवाल देणे, केलेल्या कामाचे देयक तयार करणे व ते तपासणे, कंत्राटदाराने सादर केलेले देयक तपासणे, कामांतर्गतवापरलेल्या साहित्यातल्या सर्व चाचण्या घेणे, कामांतर्गत आवश्यक ते नकाशा पुरविणे इत्यादी.	1.5 टक्के

तरी Technogem Consultant Private Limited,Thane तसेच Gherazi Eastern Limited, Mumbai यांची उपरोक्त फिस दराप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील महत्वाचे विकास योजना रस्ते तसेच चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील काही मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करून सुधारणा करणेच्या कामासाठी रू.60.00 कोटी खर्चाच्या रस्ते विकास कार्यक्रमात अंतर्भूत असलेले रस्त्यांचे कामाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळातील मान्यताप्राप्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) Technogem Consultant Private Limited, Gherazi Eastern Limited यांची एकूण प्रकल्प खर्चाच्या 2.50 टके एवढी फिस व {प्रचलित दराप्रमाणे महाराष्ट्र शासनाचा Service Tax(12.36%)अतिरिक्त} या फिस दराप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 44 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पावसाळ्यात पूर, चक्री वादळ अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये काम करण्यासाठी अग्निशमन दलास वेळोवेळी बोटीची आवश्यकता भसत होती. मा.आयुक्त यांनी दि.11.3.2007 रोजी दोन बोटी खरेदीस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. राज्यस्तरीय व स्थनिक वर्तमानपत्रातून दिलेल्या जाहीर निविदेनुसार तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. सर्वात कमी दर पद्मयोग, 664, शुक्रवार पेठ, पुणे-4311002 यांची आहे. औरंगाबाद महानगरपालिकेसाठी एक बोट रू.3,58,875/- मध्ये खरेदी करण्यात आलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेसाठी बोट खरेदीचे दर एक वर्षासाठी मान्य करण्यात आलेले आहेत. त्याच मान्य दराने दोन बोट खरेदीससाठी व त्यासाठी लागणाऱ्या र.रू.7,17,740/- च्या खर्चास मान्यतेस्तव प्रस्तावित आहे. टेक्नीकल स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे.

TECHNICAL SPECIFICATION FOR INFLATABLE BOAT	
Overall Length	5.00 Mtr.
Overall Width	1.90 Mtr.
Tube Diameter(Upper)	500 mm.
Tube Diameter(Lower)	250 mm.
Number of Chambers Upper Tube	04
Number of Chambers Lower Tube	01
Rated Capacity	12 Persons
Load Carrying Capacity	1500 Kg.
Standard Accessories	Foot Pump, Paddle, Repair Kit, Marine Ply Floor.
Weight of Boat	72 Kg. without accessories.
Propulsion	25 Hp OBM or Paddling
Construction	Double Buoyancy Tube.

आपत्कालीन व्यवस्थापन योजनेच्या अग्निशमन दलाच्या साहित्य खरेदी हेडमध्ये आर्थिक तरतुद रूपये एक कोटी रक्कमेतून आर्थिक खर्चाच्या मान्यतेसाठी खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.संजय जेशी :आपत्कालीन परीस्थितीसाठी या शहरात अग्निशमन केंद्र किती आहेत? औरंगाबाद विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन केंद्राच्या अंतर्गत औरंगाबाद जिल्हयासह जलना व बीड असे दोन जिल्हे जेडलेले आहेत.

श्री.वसंत नरवडे : आपत्कालीन सेवेसाठी दोन बोटी खरेदीचा प्रस्ताव समोर आलेला आहे. सध्या अग्निशमन विभागाकडे किती बोटी आहेत? आता दोन बोटीची मागणी केली आणि चार केंद्र आहेत. बाहेरील जिल्हयात बोटी पाठविण्याची गरज पडली व तास दोन तासात याच शहरात आपत्ती आली तर एक बोट नेहमीसाठी या शहरासाठी राखीव असावी. इतर बोटी बाहेरील ठिकाणी पाठविता येतील अशी व्यवस्था करावी. पूर्वीची एक व आता दोन खरेदी अशा तीन बोटी होतील. अग्निशमन केंद्रांची संख्या चार आहे.

मुख्य अग्निशमन अधि. : तीन अग्निशमन केंद्र सध्या चालू आहेत. आणखी एक चालू होईल. एक बोट महानगरपालिकेकडे आहे दोन बोटी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे आहेत त्या संपूर्ण मराठवाड्यासाठी दिल्या जतात. सध्या एक बोट असून आणखी दोन प्रस्तावित केल्या आहेत.

श्री.संजय जेशी : जलना व बीड हे दोन जिल्हे औरंगाबाद महापालिकेच्या विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन केंद्रास जेडलेले आहेत. जर तिकडे बोट पाठवली व त्याच वेळी या शहरात आपत्ती आली तर काय व्यवस्था होईल?

मा. आयुक्त :सभागृहाचे हे मत आहे की, एकाच वेळी आपत्ती आली तर जस्तीची बोट असावयास पाहिजे दोन बोटीचीच किंवा त्यापेक्षा जस्तीची गरज आहे यासंबंधी अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री.संजय जेशी : दोन बोटी जलना व बीड कडे दिल्या तर या शहरासाठी कोणती बोट असणार आहे. त्यासाठी आणखी एक बोट घेण्याची कार्यवाही व्हावी. त्यामुळे महापालिकेचे नुकसान नाही. केंव्हातरी कामात येईल. एक जस्तीची बोट खरेदीसाठी बजेट आहे का?

मुख्य अग्निशमन अधि. : आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

कार्य. अभियंता.(विद्यु.ड्रे): जलना, बीड व औरंगाबादसह तीन जिल्हे आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र औरंगाबाद महापालिकेकडे जेडलेले आहेत.या परीस्थितीत बोटीची आवश्यकता आहे. बोट खरेदी करणे आवश्यक आहे. एक बोट आहे दोन बोटी खरेदीचा प्रस्ताव ठेवला आहे. तुर्त तीन बोटी पुरेसे आहे. सगळीकडे एकाच वेळी आपत्कालीन परीस्थिती निर्माण होत नाही. आणखी जस्तीच्या बोटी खरेदीसाठी सभागृह मंजूरी देत असेल तर योग्यच होईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : एकाच वेळी दोन जिल्हयाच्या ठिकाणी आपत्कालीन परीस्थिती निर्माण झाली तर बोटीची व्यवस्था वेळेवर होईल का?

मा. आयुक्त : एकाच ठिकाणी जस्त परीस्थिती निर्माण झाल्यास एक ऐवजी तीनही बोटी पाठवू शकतो एकच पाठवावी असे बंधन नाही.

श्री.संजय जेशी : बजेटची तरतूद असेल तर आणखी एक बोट घेण्यात यावी अशा एकूण तीन बोटी खरेदी करण्यास मान्यता द्यावी.

मा. आयुक्त : आणखी एक बोट घेण्याची कार्यवाही करू सध्याच विकत घेण्याची गरजनाही रेट निश्चित करू किती दिवसात मिळू शकेल? २४ तासात देवू शकतील का याचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता(विद्यु. ड्रे.): तातडीने म्हटले तरी बोट येण्यास किमान १५ दिवस लागतील.

मा. सभापती : दोन बोटी खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेवून दोन बोटी ऐवजी तीन बोटी खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी, सर्वात कमी दराचे निविदाधारक पद्मयोग, 664, शुक्रवार पेठ, पुणे यांचेकडून मान्य दरानुसार दोन बोट ऐवजी तीन बोट खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच दोन बोट खरेदीसाठी लागणाऱ्या र.रू.7,17,740/- च्या व्यतिरिक्त तीन बोट खरेदीमुळे होणाऱ्या वाढीव खर्चास देखील मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 45 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन दलासाठी पोर्टेबल डायफ्राम स्लज पंप खरेदीस प्रशासकीय मान्यता दि.7/2/2007 रोजी मिळाली आहे. पावसाळ्यात नैसर्गिक आपत्ती जसे पूर, चक्रीवादळे, इमारती पडणे व घरामध्ये पाणी तुंबणे व गाळ साचणे अशा आपत्कालीन परिस्थितीतध्ये काम करण्यासाठी अग्निशमन दलास वेळोवेळी **पोर्टेबल डायफ्राम स्लज पंपची** आवश्यकता भासत आहे. सदरील पंपाचे **टेक्नीकल स्पेसीफिकेशन** खालील प्रमाणे.

PUMP'S TECHNICAL SPECIFICATIONS
1. ENGINE : Single Cylender, four stroke, air cooled, vertical, DL Diesel engine developing power of 6.1 HP at 3600 RPM with fuel tank of 3 liters capacity. Equipped with recoil rope starting arrangement for easy starting.
2. PUMP : Alluminium alloy Pump casing with an inlet suction and delivery outlet of 75 mm each. Diaphragm is of Thermoplastic rubber and able to handle liquids from 4 to 82 degree centigrade temperatures. Can handle solid particles up to 10mm in size. Can handle Fluids mixed with abrasive solids such as sand, slit, mud. sludge and waste. Delivers 90 GPM of such fluid.
3. PRIMER : Self priming type with capacity of lifting water from 4 meter depth in dry and 7 meter depth when it is filled with liquid.
4. SPEED REDUCTION GEAR BOX : Fitted with speed reduction gear box in between engine and pump. Gear box body is made out of aluminium alloy and all gears are heavy duty. Input RPM of the pump is in between 1750 to 2750. Pump speed at 1750 RPM is 40 strokes per minute and at 2750 RPM is 60 stroked per minute.
5. FRAME WORK : Both engine and pump set are mounted of flexible 90 degree rotational platform with two wheels for easiest transportation from one place to another.
6. DIMENSIONS : Height – 23" x Width – 31" x Length – 44" Weight – 90 Kgs.
7. 6 Nos. Hose pipe of 63.00 mm dia with 15 meter length with male female coupling.

विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन व साहित्य खरेदी शिर्षकामधून एक कोटी रूपयेच्या आर्थिक तरतुदी मधून दोन नग खरेदीसाठी रू.10,68,620/- खर्च होणार आहेत. तरी आर्थिक मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी पोर्टेबल डायफ्राम स्लज पंप दोन नग खरेदी करण्यासाठीच्या रक्कम रू.10,68,620/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 46 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, पडेगांव कत्तलखाना जवळील गट नं.668, 67 अंतर्गत नियोजित रेखांकन कॉलनी अंतर्गत खडीरस्ते तयार करणे या कामाचे र.रू.12,94,000/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून निविदापत्रके मागविण्यात आली असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1.	काझी मुबारीजोद्दीन बशीरोद्दीन	11.12% कमी दराने
2.	मोहम्मद सिद्दीकी अँड मो.अझहर सिद्दीकी	0.11% कमी दराने
3.	आर. के. कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.काझी मुबारीजोद्दीन बशीरोद्दीन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 11.12% ने कमी आहेत. या मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.काझी मुबारीजोद्दीन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.12% कमी दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना जवळील गट नं.668, 67 अंतर्गत नियोजित रेखांकन कॉलनी अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 11.12% कमी दराची श्री. काझी मुबारीजोद्दीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 47 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.26 गणेशनगर येथील विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थेअंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.24,96,400/- चे असून या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1.	आदीनाथ कन्स्ट्रक्शन	12.99% कमी दराने
2.	एम. ए. सिद्दीकी	8.80% कमी दराने
3.	चंद्रम्मा आशन्ना	7.00% कमी दराने
4.	ए. एस. कन्स्ट्रक्शन	0.10% कमी दराने
5.	राजेंद्रसिंग अजितसिंग	4.50% जास्त दराने
6.	के. बी. पाथ्रीकर	4.99% जास्त दराने
7.	मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने

वरील प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.99% कमी दराने आहे. मा.आयुक्त यांनी आदीनाथ कन्स्ट्रक्शन

यांच्या अं.प.दरापेक्षा 12.99% कमी दराच्या निविदेस मान्यता देवून स्थायी समितीची मंजुरी घेणेसाठी शिफारस केली आहे. तरी आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 12.99% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.26 गणेशनगर येथील विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थेअंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.99% कमी दराची आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 48 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सिडको टाऊन सेंटर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.11,97,900/- चे असून या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1.	चंद्रम्मा आशन्ना	6% कमी दराने
2.	आदीनाथ कन्स्ट्रक्शन	3.11% कमी दराने
3.	ए. एस. कन्स्ट्रक्शन	11.11% जास्त दराने
4.	रे कन्स्ट्रक्शन	6% जास्त दराने
5.	के. बी. पाथ्रीकर	4.90% जास्त दराने
6.	राजेंद्रसिंग अजितसिंग	4.50% जास्त दराने
7.	मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने
8.	एम. ए. सिद्दीकी	अंदाजपत्रकीय दराने

वरील प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही चंद्रम्मा आशन्ना यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6% कमी दराने आहे. मा.आयुक्त यांनी चंद्रम्मा आशन्ना यांच्या अं.प.दरापेक्षा 6% कमी दराच्या निविदेस मान्यता देवून स्थायी समितीची मंजुरी घेणेसाठी शिफारस केली आहे.

तरी चंद्रम्मा आशन्ना यांची अं.प.दरापेक्षा 6% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको टाऊन सेंटर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 6% कमी दराची चंद्रम्मा आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 49 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, आरेफ कॉलनी येथील मुख्य रस्ता व डी.पी.रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,96,00/- चे असून या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1.	चंद्रम्मा आशन्ना	6% कमी दराने
2.	आदीनाथ कन्स्ट्रक्शन	3.11% कमी दराने
3.	ए. एस. कन्स्ट्रक्शन	10.11% जास्त दराने
4.	के. बी. पाथ्रीकर	4.91% जास्त दराने
5.	एम. ए. सिद्दीकी	3.30% जास्त दराने
6.	मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने

वरील प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही चंद्रम्मा आशन्ना यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6% कमी दराने आहे. मा.आयुक्त यांनी चंद्रम्मा आशन्ना यांच्या अं.प.दरापेक्षा 6% कमी दराच्या निविदेस मान्यता देवून स्थायी समितीची मंजुरी घेणेसाठी शिफारस केली आहे.

तरी चंद्रम्मा आशन्ना यांची अं.प.दरापेक्षा 6% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरेफ कॉलनी येथील मुख्य रस्ता व डी.पी.रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 6% कमी दराची चंद्रम्मा आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 50 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नौबत दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी यापुर्वी तीन वेळेस निविदा बोलाविण्यात आल्या होत्या. त्यापैकी दोन वेळेस सदर कामासाठी जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या व तिसऱ्या वेळेस निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकही निविदा विक्री झाली नाही. त्यामुळे या कामाचे ऐतिहासिक वास्तुसंबंधी संस्था इनटॅक यांच्याकडून सुधारीत दरसुचीनुसार अंदाजपत्रक मागितले असता त्यांनी रक्कम रू.17,50,000/- चे सुधारीत अंदाजपत्रक सादर केले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात ऐतिहासिक दरवाजे देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणार आहे. प्रस्तुत सुधारीत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे व स्थायी समितीची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केले आहे.

तरी सदरील कामासाठी रक्कम रू.17,50,000/- च्या सुधारीत अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नौबत दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,50,000/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 51 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **भारत सरकारच्या आपत्कालीन व्यवस्थापन कायदा 2005** नुसार व महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णय क्र.डीएमयु-2006/सीआर-11/डीएम-1, मंत्रालय, मुंबई-32, दि.25/7/2006 नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने **"विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र"** स्थापन केलेले आहे. औरंगाबाद जिल्हा, जालना जिल्हा व बीड जिल्ह्यासाठी **शोध व बचाव कार्य पथकाला** आपत्कालीन सेवा पुरवावी लागणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णय दिनांक 25/7/2006 नुसार **"शोध व बचाव कार्य प्रमुख"** म्हणून मुख्य अग्निशमन अधिकारी यांना निर्देशीत केले आहे. अग्निशमन विभागाकडे असलेली सध्याची मारोती जिप्सी ही गाडी दि.8/1/1997 रोजी खरेदी केली होती व टायर रन 1,42,116 कि.मी. झालेले आहे. ही जिप्सी गाडी जुनी झाली असून वेळोवेळी बंद पडत आहे.

मागील वर्षी औरंगाबाद व औरंगाबाद जिल्ह्यात पावसाळ्यात **शोध व बचाव कार्य पथकाने** सेवा पुरविली होती. जसे कावसान(जुने) पैठण येथून 23 नागरिकांना पैठणच्या गोदावरी नदीच्या सर्वात मोठ्या पुरामधून सुखरूप बाहेर काढण्याचे काम शोध व बचाव कार्य पथकाने केले. **औरंगाबाद, बीड, जालना** जिल्ह्यातून गोदावरी नदी वाहत आहे. त्यामुळे वेळोवेळी शोध व बचाव कार्य पथकाला या तीनही जिल्ह्यामध्ये जीवीत व वित्तहानी वाचविण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन कायदा 2005 नुसार कार्य करावेच लागणार आहे.

शहर आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे. त्याचे नोडल ऑफीसर म्हणून मुख्य अग्निशमन अधिकारी यांना निर्देशीत केले आहे. तसेच **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती** मध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी यांना शोध व बचाव कार्य पथक-1 मध्ये निर्देशीत केले आहे.

सिल्लोड/गंगापूर येथून 20 जणांना रेस्क्यु(बचाव कार्य) केले आहे. महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने 1987 ते 2007 या काळात खालील प्रमाणे कार्य केले आहे.

एकूण कॉल	फायर कॉल	रेस्क्यू कॉल	इतर कॉल	खोटे कॉल	आगीमुळे नुकसान किंमत रू.	आगीतून वाचवलेली मालमत्ता-किंमत रू.	मृत	जखमी	वाचवले
7016	**3480**	**1784**	**1730**	**40**	**1,97,85,00,269**	**6,53,85,28,865**	**582**	**987**	**1008**

जिप्सी सारखीच टाटा सफारी ही फोर व्हील ड्राईव्हसह पेट्रोलवरील वाहन आहे. तसेच ग्राऊंड क्लिअरन्स इतर वाहनांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे वेळेत शोध व बचाव कार्य पथक पोहचून जिवीत व वित्तहानी वाचवण्यास मदत होईल.

जनतेची जिवीत व वित्तहानी वाचविण्यासाठी व शोध व बचाव कार्य वेळेत करण्यासाठी टाटा सफारी(फोर व्हील ड्राईव्ह-पेट्रोल) खरेदी करण्यासाठीचा अपेक्षीत खर्च रू.11,63,450/- (इन्शुरन्स विथ टयुबलेस टायर) आपत्कालीन व्यवस्थापन व साहित्य खरेदी शिर्षकामधून एक कोटी रूपये आर्थिक तरतुदीतून खर्च होणार आहे. टाटा मोटर्सचे अधिकृत विक्रेते सान्या मोटर्स, जालना रोड, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त दरपत्रकाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

Model No.	**TATA SAFARI VXI 4x4**
Show Room Price	**Rs.10,88,443/-**
Insurance Charges	**Rs.40,000/-**
Tubeless Tyre (5 Nos.)	**Rs.34,765/-**
Total	**Rs.11,63,450/-**
	+ Octroi + RTO Tax if required

वर नमुद केलेल्या तपशीलानुसार सान्या मोटर्स यांच्याकडून TATA SAFARI VXI 4x4 खरेदीस व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावास विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारत सरकारच्या आपत्कालीन व्यवस्थापन कायदा 2005 नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने **"विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र"** स्थापन केलेले असल्याने औरंगाबाद जिल्हा, जालना जिल्हा व बीड जिल्ह्यासाठी **शोध व बचाव कार्य पथकाला** आपत्कालीन सेवा, शोध व बचाव कार्य वेळेत करण्यासाठी मुख्य अग्निशमन अधिकारी तथा नोडल ऑफीसर, शहर आपत्ती व्यवस्थापन समिती यांचेसाठी खालील दर्शविलेल्या तपशीलाप्रमाणे टाटा सफारी (फोर व्हील ड्राईव्ह-पेट्रोल) खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

Model No.	**TATA SAFARI VXI 4x4**
Show Room Price	**Rs.10,88,443/-**
Insurance Charges	**Rs.40,000/-**
Tubeless Tyre (5 Nos.)	**Rs.34,765/-**
Total	**Rs.11,63,450/-**
	+ Octroi + RTO Tax if required

वर नमुद केलेल्या तपशीलानुसार सान्या मोटर्स, जालना रोड, औरंगाबाद यांच्याकडून TATA SAFARI VXI 4x4 खरेदीस व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.11,63,450/- च्या अपेक्षीत खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 52 :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाधववाडी येथे यांत्रिकी कार्यशाळा, शौचालय बांधणे, जलवाहिनी टाकणे, विद्युत दिवे लावणे, वे-ब्रीज पुरवठा करणेच्या कामासाठी सा.बां. विभागाचे दरसुची सन 2006-2007 नुसार प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.68,03,253/- चे असून या कामाचा खर्च सन 2007-2008 या आर्थिक वर्षातील "वाहतुक नगर विकसीत करणे" या लेखा शिर्षा अंतर्गत प्रस्तावित आहे. या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहे.

1.	मे. अमन असोसिएट्स	0.79% कमी दराने
2.	मे. सिद्दीकी आणि मो.अजहर सिद्दीकी	4.59% जास्त दराने
3.	मे. एल.के. कन्स्ट्रक्शन	4.99% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.अमन असोसिएट्स यांची असून ती अंदाजपत्रक दरापेक्षा 0.79% कमी दराची आहे. करीता मे.अमन असोसिएट्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.79% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाधववाडी येथे यांत्रिकी कार्यशाळा, शौचालय बांधणे, जलवाहिनी टाकणे, विद्युत दिवे लावणे, वे-ब्रीज पुरवठा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 0.79% कमी दराची मे. अमन असोसिएट्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

विषय क्र.53 : (दि.29-5-2007 रोजीच्या स्था.स.सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.20)

महानगरपालिकेकडून **एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP)** ही योजना राबविणे आहे. केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP) या योजनेमध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील संपूर्ण झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचे नकाशे, सुनियोजित झोपडपट्ट्यांचे नकाशे हे शहर विकास आराखड्यानुसार सादर करणे, कामाचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे, देण्यात येणारी कामे गुत्तेदाराकडून निविदेच्या अटी शर्तीनुसार पूर्ण करून घेणे, प्रकल्पावर वेळोवेळी देखरेख करणे व त्याबाबत अहवाल सादर करणे. कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणे, सदरील प्रकल्प अहवाल म्हाडा कार्यालयात दाखल करणे व मंजुरीसाठी त्याचा पाठपुरावा करणे इत्यादी कामे करावयाची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची राहील.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना वरील कर्तव्ये पार पाडण्यासाठी महानगरपालिकेकडून प्रकल्पाचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% (दीड टक्के) इतकी रक्कम मोबदला स्वरूपात देय राहिल. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये 5% (पाच टक्के) तरतुद ठेवण्यात आलेले असुन त्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या 5% मधून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना 1.5% देय राहिल. सदरहू प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकी बाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यात यावेत.

तरी **एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP)** या योजनेच्या कामाचा देखरेख कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री. कचरू मोरे : 29-5-07 च्या बैठकीत एकात्मिक गृहनिर्माण योजने अंतर्गत झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षणासाठी पीएमसी नेमण्यासंबंधीचा प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. लोक कल्याणकारी योजना आहे. अनु.जाती, अनु.जमाती, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी फायदेशीर असा प्रस्ताव आहे. सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : माझा विरोध नोंदवून प्रस्ताव मंजूर करावा.

उप अभियंता(स्लम) : एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP) या योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करून, आर्क असोसिएटस्, औरंगाबाद व इन्फ्रास्ट्रक्चर कन्सल्टंट, पुणे या PMC ने प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे.

मा. सभापती : दि. 29 मे 07 च्या बैठकीत स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव या सभेत ऐनवेळचा प्रस्ताव म्हणून घेण्यात येतो. प्रस्तावित योजने अंतर्गत, आर्क असोसिएटस्, औरंगाबाद व इन्फ्रास्ट्रक्चर कन्सल्टंट, पुणे या PMC ने एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम या योजनेचा प्रकल्प अहवाल तयार केलेला असल्याचे संबंधीत विभागाचे अधिकारी यांनी नमूद केलेले आहे. सदरच्या कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेकडून **एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम (IHSDP)** ही योजना राबविणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना प्रस्तावात नमूद कर्तव्ये पार पाडण्यासाठी महानगरपालिकेकडून प्रकल्पाचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% (दीड

टक्के) इतकी रक्कम मोबदला स्वरूपात देण्यास व या योजनेच्या कामावर देखरेख करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून, आर्क असोसिएटस्, औरंगाबाद व इन्फ्रास्ट्रक्चर कन्सल्टंट, पुणे यांची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.54 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभा विषय क्र.677 दिनांक 11.1.2006 अन्वये महानगरपालिका महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने प्रत्येक प्रभागातील होतकरू व रोजगाराची आवश्यकता असेल, अशा महिला बचत गटास पिठाची गिरणी उपलब्ध करून देणे बाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार महिला व बाल कल्याण समितीच्या बैठकीतील विषय क्र.17 अन्वये विहित अटी व नियम यांचे कक्षेत बसणाऱ्या बचत गटास एकूण 98 गिरण्या देण्याबाबतच्या प्रस्तावास व संभाव्य खर्चास मान्यता देणेत आली.

जा.क्र.मनपा/मबाकस/48/2007, दिनांक 9.4.2007 अन्वये दै.लोकमत, सकाळ व औरंगाबाद टाईम्स या वृत्तपत्रातून दि.10.4.2007 रोजी जाहीर निविदा प्रसिध्द करून आएसओ-9001-2000 प्रमाणित **पिठाची गिरणी युनिट** खरेदी करणे बाबत जाहिरात प्रकाशित करण्यात आली. दि.18.4.2007 पर्यंत एकूण चार निविदांची विक्री झाली व अंतिम दिनांकास म्हणजे दि.23.4.2007 पर्यंत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. या निविदांचा तपशील खालील प्रमाणे.

1.	किसन मशिनरी स्टोअर्स	नटराज आयमेकरए ISO प्रमाणित	रू.**16,120**/- प्रति नग
2.	सोलापूर मशिनरी स्टोअर्स	न्यु अमरदिप आटामेकर, ISO प्रमाणित	रू.**15,500**/- प्रति नग
3.	अभय ट्रेडर्स	नमुना अप्राप्त	त्यामुळे लिफाफा क्र.2 उघडण्यात आला नाही.
4.	प्रविण एजन्सी	नमुना अप्राप्त	त्यामुळे लिफाफा क्र.2 उघडण्यात आला नाही.

प्रशासकीय मान्यतेस्तव पाठविण्यात आलेल्या संचिकेतील पृष्ठांक क्र.एन-10 वरील मा.आयुक्त यांनी अंकित केल्यानुसार शहर अभियंता यांचेकडून प्राप्त नमुन्याबाबत तांत्रिक अहवाल घेण्यात आला. त्यानुसार अ.क्र.2 सोलापूर मशिनरी स्टोअर्स यांचे न्यु अमरदिप आटामेकर योग्य असल्याबाबत अहवाल प्राप्त झाला. त्यानुसार सोलापूर मशिनरी स्टोअर्स यांचेकडून एकूण 98 पिठाची गिरणी युनिट खरेदी करावयाचे झाल्यास एकूण रक्कम रू.15,19,000/- (पंधरा लाख एकोणावीस हजार फक्त) खर्च अपेक्षीत आहे. तरी प्रस्ताव संभाव्य खर्चासह स्थायी समितीचे विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने प्रत्येक प्रभागातील होतकरू व रोजगाराची आवश्यकता असेल, अशा महिला बचत गटास पिठाची गिरणी उपलब्ध करून देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदा धारक **मे.सोलापूर मशिनरी स्टोअर्स** यांचेकडून **न्यु अमरदिप आटामेकर**, प्रतिनग रू.15,500/- या दराने एकूण 98 युनिट खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.15,19,000/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद